RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १४९ वा शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

संपर्क

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# सरकारचे शिष्टमंडळ जरांगेंशी चर्चा करणार; सरकार अत्यंत सकारात्मक : विखे पाटील

**मुंबई/प्रतिनिधी : मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करणाऱ्या मनोज जरांगेंशी आता सरकारने चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे सदस्य आज जरांगे यांच्याशी चर्चा करण्यासाठी आझाद मैदानावर जाणार आहेत. या समितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. आमच्या समितीचे एक शिष्टमंडळ आज जरांगेंशी चर्चा करेल. या चर्चेत आणखी काही मुद्दे उपस्थित होतील. त्यावर पुन्हा समितीत चर्चा होईल, असे ते म्हणालेत.**



मराठा आरक्षण उप समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या रॉयल स्टोन बंगल्यावर मराठा आरक्षण उपसमितीची आज बैठक झाली. या बैठकीत मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करण्यासाठी एक शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय झाला. या बैठकीला मंत्री दादा भुसे, माणिकराव कोकाटे, गिरीश महाजन यांच्यासह इतर अनेक बडे नेते व अधिकारी उपस्थित आहेत. या बैठकीनंतर बोलताना विखे पाटील यांनी सांगितले की, आज मराठा उपसमितीच्या बैठकीला आम्ही सर्वच सदस्य उपस्थित होतो. बैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अतिशय सविस्तर चर्चा झाली. आम्हा सर्वांची सकारात्मक भूमिका आहे.

सरकारचीही या प्रश्नाची सोडवणूक झाली पाहिजे अशी भूमिका आहे. त्यामुळे या सर्व मुद्यांवर चर्चा करण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे, विभागीय आयुक्त कोकण व आमच्या समितीचे सदस्य सचिव हे त्यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी जाणार आहेत. ते तिथे जरांगेंना सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देतील. या चर्चेत आणखी काही मुद्दे उपस्थित होतील. त्यावर पुन्हा आम्ही समितीत चर्चा करून योग्य तो मार्ग काढला जाईल. या प्रकरणी न्यायमूर्ती शिंदे हे आंदोलकांशी भेटणार आहेत. ते भेटण्यापूर्वी मी यावर बोलणे योग्य ठरणार नाही. त्यांची चर्चा होऊ द्या, मग सरकार पुन्हा यावर आपले मत व्यक्त करेल, असे ते म्हणाले.

महायुतीच्या अनेक आमदारांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. हा विरोधाभास नाही काय? असा प्रश्न यावेळी पत्रकारांनी विखे पाटलांना केला. त्यावर ते म्हणाले, महायुती म्हणून आमची भूमिका एकच आहे. आम्ही सर्वजण एकजूट आहोत. पण काहीजण स्थानिक परिस्थितीनुसार त्यांच्या स्टेजवर गेले. त्यांच्याशी चर्चा केली. शेवटी सर्वांची एकच भूमिका आहे की, हा प्रश्न सुटला पाहिजे. माझ्या मते, आता यावर राजकारण करण्यापेक्षा हा प्रश्न लवकर कसा सुटेल? या दृष्टिने आपण सर्वांनी याकडे पाहिले पाहिजे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आंदोलकांची भेट घेण्याची सूचना केली आहे. विखे पाटील यांनी यावर भाष्य करताना सरकारला संजय राऊत यांच्या सल्ल्याची गरज नसल्याचे ठणकावून सांगितले. संजय राऊत यांच्याशी शिफारशींची किंवा सूचनांची आम्हाला आवश्यकता नाही. आमची समिती या प्रकरणी काम करण्यासाठी सक्षम आहे. शेवटी राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्र्यांची भूमिका नेहमीच सकारात्मक राहिली आहे. राज्यात महाविकास आघाडीचे अडीच वर्षे सरकार होते. संजय राऊत यांनी त्यांना हा प्रश्न का सोडवला नाही? हा प्रश्न विचारला पाहिजे, असे ते म्हणाले.

पक्षीय राजकारणाच्या अनुषंगाने एकमेकांवर टीका करण्यापेक्षा हा प्रश्न कसा सुटेल यावर आता सर्वांनी प्राधान्य दिले पाहिजे. मागे काय घडले यापेक्षा आपण पुढे गेले पाहिजे. यातून मार्ग कसा निघेल हे पाहिले पाहिजे, असे विखे म्हणाले.

विखे पाटलांनी यावेळी लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलनाचा अधिकार असल्याचेही स्पष्ट केले. मराठा आरक्षणासाठी जी काही मंडळी मुंबईत आली आहे, तो त्यांचा हक्क आहे, अधिकार आहे. त्यांच्यामुळे मुंबई थांबली आणि थांबणार आहे असे अशा गोष्टींचे मी समर्थन करत नाही. यापूर्वीही अनेकदा वेगवेगळ्या घटकांचे मोर्चे निघालेत. तेव्हा मुंबई थांबली नव्हती का? आज केवळ मराठा समाज आंदोलन करत आहे म्हणून मुंबई थांबली असा आरोप करणे चुकीचे आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. ते आंदोलन करत आहे. शासन त्यांची भूमिका ऐकूण घेत आहे. त्यांच्या भावनेचा आदर करण्याची गरज आहे, असे मला वाटते, असे विखे पाटील म्हणाले.

स्वतः मनोज जरांगे यांनी समाजाला शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. पण काही समाजकंटक हे आंदोलन बदनाम करण्यासाठी यात घुसले असतील. जरांगे याविषयी सतर्क आहे. सरकारचेही या प्रकरणी आवाहन आहे की, शांततेत सुरू असलेल्या आंदोलनाला वेगळा मार्ग लागेल असे कृत्य कुणीही करू नये, असे

## आंदोलकांना योग्य त्या सुविधा उपलब्ध

पत्रकारांनी यावेळी मराठा आंदोलकांची आझाद मैदानासह मुंबईत गैरसोय होत असल्याची बाब विखे पाटलांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर ते म्हणाले, पाऊस जास्त होता. या प्रकरणी रात्री मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. त्यानंतर आता बऱ्यापैकी तिथे लाईट्स व पाण्याची सोय करण्यात आली आहे. स्वच्छतेचेही काम वाढवण्यात आले आहे. चिखल जास्त आहे. त्यामुळे आंदोलकांचा त्रास कमी करण्यासाठी मैदानावरील खड्डे भरण्यात येत आहे. लाईट्स, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाणी आदी सर्वच बाबींची पूर्तता केली जात आहे. महापालिकेचे आयुक्तही या बैठकीला होते. त्यांना या सूचना देण्यात आल्या आहेत.

# मराठा आरक्षणावर शरद पवारांचे मोठे वक्तव्य, 'तामिळनाडूत होऊ शकते तर महाराष्ट्रात का नाही?'



**मुंबई/प्रतिनिधी** : मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली मुंबईतील आझाद मैदानात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सर्वात मोठे आंदोलन छेडले गेले असताना आता राज्यातील सर्वात बुजुर्ग आणि जाणते नेते शरद पवार यांनी याबाबत महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. ७२ टक्के आरक्षण तामिळनाडूमध्ये होऊ शकते. तर घटनेत बदल करता येऊ शकते. घटनेत बदल करण्याची भूमिका घेतली तरच मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो, असे शरद पवार यांनी म्हटले. ते अहिल्यानगर येथील एका कार्यक्रमात बोलत होते.

यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांना मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याबाबत आपली भूमिका जाहीर करण्यास सांगितले होते. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांचे वक्तव्य महत्त्वपूर्ण मानले जात आहे. शरद पवार यांनी मराठा आरक्षणाच्या बाजूने भूमिका घेतली आहे. त्यांनी म्हटले की, प्रगतीच्या रस्त्यावर जायचे असेल तर त्याला आरक्षणाच्या मार्गाने जावे लागेल असा एक विचार आहे. केंद्राच्या पातळीवर धोरणात्मक निर्णय घेण्याचा वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत. विकासाच्या नावाखाली शेतीच्या जमिनी कमी होत आहेत. तर शेतीवर अवलंबून घटक वाढत आहे. त्यामुळे तांत्रिक बाबींचा विचार करून शेती केली पाहिजे. शेतीत AI चा वापर करायला हवा. रयत शिक्षण संस्थेने यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या प्रयत्नांना जनतेने देखील सहकार्य करणे गरजेचे आहे, असे शरद पवार यांनी म्हटले.

काँग्रेस हा मोठा पक्ष होता, जेव्हा या पक्षाचे दोन भाग झाले तेंव्हा त्यात समाजवादी विचार आणि साम्यवादी विचार होता. हे विचार सर्वाधिक अहिल्यानगर जिल्ह्यात पाहायला मिळाले. या जिल्ह्यातील स्वातंत्र्यचा लाभ तळागाळापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. अहिल्यानगर जिल्ह्यात साम्यवादचा विचार, गांधींचा विचार होता. मात्र, आता याच जिल्ह्यात भाजप, आरएसएसची विचारधारा वाढत आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असे शरद पवार यांनी म्हटले.

# लातूर जिल्हा परिषदेकडून शेतकऱ्यांसाठी कृषी औजारांवर अनुदान योजना

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत सन २०२५–२६ मध्ये सेस निधीतून शेतकऱ्यांना कडबाकुट्टी, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र (बीबीएफ) आणि स्लरी फिल्टर खरेदीसाठी डीबीटी तत्त्वावर अनुदान देण्याची योजना राबवली जात आहे. शेती खर्च कमी करून उत्पादन वाढवण्याच्या उद्देशाने राबवल्या जाणाऱ्या या योजनेसाठी २९ ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, शेतकऱ्यांनी १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत पंचायत समिती कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी दीपक सुपेकर यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज पंचायत समिती कार्यालयात किंवा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावरून घेऊन, आवश्यक कागदपत्रांसह (सातबारा, आठ अ उतारा, जातीचा दाखला (अनुसूचित जाती/जमातींसाठी), ट्रॅक्टरचा पुरावा (बीबीएफसाठी)) १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत जमा करावेत. अर्जांची छाननी करून ज्येष्ठता सूचीनुसार पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती दिली जाईल. खरेदीनंतर मोका तपासणी होऊन अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात (डीबीटी) जमा होईल. तरी शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. योजनेबाबत माहितीसाठी संबंधित तालुका पंचायत समितीतील कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (कृषी) किंवा जिल्हा परिषद येथील कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी दिपक सुपेकर यांनी केले आहे.

**योजनेचे स्वरूप आणि अनुदान**

३ एचपी कडबाकुट्टी– खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल १४ हजार रुपये.

५ एचपी कडबाकुट्टी– खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल १७ हजार रुपये.

रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र– खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल ३२ हजार ५०० रुपये.

स्लरी फिल्टर (टाकीसह)– खरेदी किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल २० हजार रुपये.

# सावित्रीबाई फुले आधार आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या, परंतु वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२५–२६ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात ६०० विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

या योजनेद्वारे महसुली विभाग शहर आणि क वर्ग महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्त्यासाठी ४३ हजार रुपये, जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्यांना ३८ हजार रुपये आणि तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ३२ हजार रुपये थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केले जाणार आहेत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा आणि वसतिगृह प्रवेशास पात्र असावा. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक असून पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी त्या शहराचा रहिवाशी नसावा, जिथे शैक्षणिक संस्था आहे. विद्यार्थ्याने बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेतलेले असावे आणि बारावीत किमान ६० टक्के गुण असावेत.

इच्छुक विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी, तर इतर पात्र विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फ ुले आधार योजनेसाठी अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी भगवान केंद्रे (मो. ९५६११०९०१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**राज्यात ३४ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार ३३ हजार जणांना रोजगार निर्मिती...**



**चिमटा दयाचा**

**ध्वनी प्रदुषणने सर्वावर परिणाम होत आहे ! तरी या कायद्याचे उल्लंघन होत आहे !! कडक शिक्षेची गरज आहे !!**

# डीजे, डॉल्बीचा दणदणाट नको; लातूर शहरातील व जिल्ह्यातील १६ डीजे/डॉल्बींवर पोलीसांची कारवाई

## आपले लातूर सुरक्षित लातूर उपक्रमास जिल्हाभरातील गणेश मंडळांचा सीसीटीव्ही लावून उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी** : गणेशोत्सवाचे अनुषंगाने लातूर शहरात दि.२७/०८/२०२५ रोजी श्री. गणेशाचे आगमन मोठ्या उत्साहात करण्यात आले. यंदाचा गणेशोत्सव हा डीजे / डॉल्बी मुक्त करणेबाबत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने सर्व गणेशमंडळा चे पदाधिकारी व भक्तांना मिरवणुकीमध्ये डीजे /डॉल्बी न लावणे विषयी आवाहन करण्यात आलेले होते. त्याला प्रतीसाद देत अनेक गणेश मंडळांनी पारंपारीक वाद्यांना संधी उपलब्ध करून देत डीजे / डॉल्बीला नाकारले आहे. तसेच लातूर जिल्हा पोलीस दलातर्फे आपले लातूर सुरक्षित लातूर अभियान राबवून गणेश मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आवाहन जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात आले होते.

लातूर जिल्हा पोलिसांच्या सीसीटीव्ही लावण्याच्या आवाहनाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत ६१ गणेश मंडळांनी २७४ सीसीटीव्ही कॅमेरे



लावलेले आहेत व अजून १२३ गणेश मंडळ ४७८ कॅमेरे लावणार आहेत. श्री गणेशांचे विसर्जन झाल्यानंतर सदरील कॅमेरे शहरात महत्त्वाच्या चौकात, गावामध्ये कायमचे लावून आपल्या लातूरची सुरक्षा वाढविण्यास हातभार होणार आहे. सदर कॅमेऱ्याची देखभाल गणेश मंडळांनी करावयाचे आहे.

तथापी काही गणेश मंडळांनी डीजे/ डॉल्बीचा वापर करून ध्वनीप्रदुषन कायद्याचे उल्लंघन केले आहे.

गांधी चौक पोलीस स्टेशन हद्दीतील ०५, शिवाजी नगर पोलीस स्टेशन हद्दीतील ०३ व एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील ०२, पोलीस स्टेशन मुरुड हद्दीत ०४, पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण हद्दीतील ०१ व पोलीस स्टेशन अहमदपूर हद्दीतील ०१ अशा एकुण १६ मंडळांनी ध्वनीप्रदुषण कायद्याचे उल्लंघण केल्याचे आढळुन आल्याने त्यांचेवर प्रचलीत कायद्यान्वये कारवाई करण्यात येत आहे.

**पुढील गणेश मंडळावर ध्वनी प्रदूषण नियमांतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.**

**पोस्टे शिवाजीनगर हद्दीतील**

१) एकता गणेश मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर.

२) महाराजा गणेश मंडळ,छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर.

३) ओडिया राज गणेश मंडळ, ओडिया राज चौक, लातूर.

**पोस्टे एमआयडीसी हद्दीतील**

४) जय बजरंग गणेश मंडळ, आर्वी गायराना लातूर.

५) सूर्या गणेश मंडळ, एमआयटी कॉलेज जवळ, लातूर.

**पोस्टे गांधी चौक हद्दीतील**

६) जय हो मोरया गणेश मंडळ, सुळ गल्ली, लातूर

७) रामलिंगेश्वर गणेश मंडळ, काळे गल्ली, लातूर

८) वीर तानाजी गणेश मंडळ, गडदे गल्ली, लातूर

९) सरदार वल्लभभाई पटेल गणेश मंडळ, पटेल चौक, लातूर

१०) साईबाबा गणेश मंडळ, मिस्किनपुरा, लातूर

**पोस्टे उदगीर ग्रामीण हद्दीतील**

११)बाल गणेश मंडळ, समता नगर उदगीर,

पोस्टे अहमदपूर हद्दीतील

१२) पंजोबा गणेश मंडळ, पाटील गल्ली अहमदपूर.

**पोस्टे मुरुड हद्दीतील**

१३) मुरुडचा महाराजा गणेश मंडळ, बस स्थानक समोर, मुरुड.

१४) शिव क्रांती शिव क्रांती गणेश मंडळ, भाजी भाकरी नगर, मुरुड.

१५) जगदंबा गणेश मंडळ जगदंबा गणेश मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, चौक मुरुड.

१६) शंभूराजे गणेश मंडळ, बसवेश्वर चौक, मुरुड. असे आहेत.

अशाप्रकारे वरील नमूद गणेश मंडळांच्या डीजे/डॉल्बी चालकांवर पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम १५ अन्वये ५ वर्षाचा कारावास व १ लाख रुपयांपर्यंत दंडात्मक कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच यापुढे कोणत्याही सण उत्सव, जयंती दरम्यान, गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान पारंपारिक वाद्यांचा वापर करण्यात यावा डीजे/ डॉल्बी चा वापर कोणीही करू नये असे लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने परत एकदा आवाहन करण्यात येत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार


## गणपतीच्या आगमनाबरोबर पावसाची जोदार हजेरी

राज्यात काय देशात पावसाने कहर केला आहे. पाणीच पाणी चोहीकडे दिसून येत आहे. महाराष्ट्रात सर्वांचा आवडता उत्सव हा गणपती आहे. गणपतीचे आगमनाबरोबर पावसाने मोठ्या प्रामाणात आगमन झाले. हा पावुस गणपती यांचा मुक्काम असे पर्यंत आहे की काय अशी शंका निर्माण होत आहे. त्यामुळे पावसाने उद्भवलेल्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लातूर, धाराशिव, नांदेड म्हणजे मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात पावसाने जोर धरला आहे. अनेक नद्यांना पूरजन्य स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. उजनी धरण पुर्ण क्षमतेने भरले आहे. त्यामुळे परिस्थितीवर मात करण्यासाठी बचव पथकाची मदत घेतली आहे, शुक्रवारी शाळांना सुट्टी दिली होती. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात तर मोठी दैना खाली झाली आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. प्रशासन अनेक बाबीवर लक्ष ठेऊन आहे. बचाव केला जात आहे. नागरिकांनी घरा बाहेर पडू नये असा सल्ला प्रशासनाकडून दिला जात आहे. त्यामुळे राज्यात पावसाने मोठी बिकट आवस्था केली आहे. ओला दुष्काळजन्य स्थिती निर्माण झाली आहे. मराठवाड्यात सर्वात मोठे नुकसान शेतीचे झाले आहे. खरीपाचे पीक जवळपास सर्वच पाण्यात गेले आहे. सोयाबिनची अधिक पेरणी झाली आहे. ती आता हाती लागेल असे वाटत नाही. शेतात पाणी आहे. सरकारकडून अंदाज घेवुन पंचनामे केली जाणार असल्याचे म्हटले जात आहे. पाऊस म्हटला तर सर्वात अधिक नुकसान शेतकऱ्याचे होते. कारण ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीवरच अर्थकारण आवलंबुन आहे. अशा स्थितीत सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. मुळात पावसाळा एवढ्या मोठ्या प्रमाणात होईल याचा अंदाज कोणालाही आला नसेल. राज्यातील तळे, नदी, बंधारे हे पुर्ण क्षमतेनी भरले आहेत. अनेक बंधाऱ्यात जलसाठा वाढल्याने बंधाऱ्यास धोका होवू नये म्हणून पाणी सोडले जात आहे. पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात केला जात आहे. अशा स्थितीत आजू-बाजूच्या गावांना, शेतकऱ्यास धोका होवू नये म्हणून पुर्व खबरदारी दिली जात आहे. नदी काठच्या लोकांना नदी पात्रात उतरू नये, जावू नये. आपआपली जनावरे सांभाळावीत अशा सुचना दिल्या आहेत. अनेक धरणाच्या परिसरात तीन दिवसापासून पाऊस पडत असल्याने पाणी साठ्यात वाढ होत आहे. अनेक ठिकाणाहून पाणी वाहात जमा होत आहे. त्यामुळे वेळीच सावध होणे आवश्यक आहे. मराठवाड्यात पाऊस नाही अशी ओरड होत असताना गणपतीचे आगमन झाल्यापासून सतत पाऊसाच्या सरी कोसळत आहेत. सुर्यदर्शन अजिबात झालेले नाही. राज्यात अनेक रस्त्यावर व पुलावरून पाणी वाहात आहेत. अनेक गावाचा संपर्क तुटला आहे. ज्या गावालगत नदी आहे त्यांना तर मोठा धोका असल्याचे दिसून येते. एनडीआरएफचे पथक काही ठिकाणी तैनात करण्यात आली आहेत. जनतेला यापुढे आता स्वसंरक्षण कसे करावे या बाबत धडे देण्याची गरज आहे. शालेय अभ्यासक्रमात पावुस काय कोणतेही नैसर्गिक संकट ओढावल्यास यावर कशा प्रकारे मात करावी याचे धडे देण्याची गरज आहे. जायकवाडी, मांजरा, धनेगाव डॅम, * सीनेकोळेगाव आदि धरणात पाणीसाठा वाढत आहे. क्षमतेपेक्षा अधिक होत असल्याने विसर्ग केला जात आहे. धोका होवू नये म्हणून दरवाजे मर्यादित उघडले जात आहेत. केवळ महाराष्ट्रात पावुस आहे असे नाही तर संपूर्ण देशात पावसाने थैमान घातले आहे. बऱ्याच ठिकाणी ढगफुटी होत आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही झाले तरी राज्यात पावसाने मोठी दैना केली आहे. यात सर्वाधिक शेतकरी संकटात सापडला आहे. हाताचे पीक गेल्याने आता संसार कांहीचा उघड्यावर पडला आहे. लातूरच्या २९ मंडळांत तर नांदेडच्या १७ मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. बीड जिल्ह्यात धारूरला पुराच्या पाण्यात दोन जण वाहून गेले. त्यापैकी एकाचा मृतदेह सापडला तर दुसरा बेपत्ता आहे. दुसरीकडे, पश्चिम महाराष्ट्रातही जळगावसह काही ठिकाणी पावसाच्या सरी बरसल्या. तर यवतमाळमध्ये वीज कोसळून एकाचा मृत्यू, वर्ध्यात २९ शेळ्या ठार झाल्या. छत्रपती संभाजीनगरात आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर गुरुवारी पावसाचे जोरदार पुनरागमन केले. दुपारी ३ ते सायंकाळी ५.३० या अवघ्या अडीच तासांत शहरात १९ मिमी पाऊस पडला. शहरात तीन ठिकाणी झाडे उन्मळून पडली तसेच सखल भागात साचले. दुसरीकडे, गुरुवारी सकाळपर्यंत लातुरात ६२.८ मिमी, नांदेडात ४३.४ मिमी, तर परभणीत २६.३ मिमी आणि बीडमध्ये २५ मिमी, जालन्याला १६ मिमी, धाराशिव २४.६, हिंगोलीत १०.४ मिमी पावसाची नोंद झाली. लातूर जिल्ह्यातील २९ मंडळांत अतिवृष्टी झाली असून ४९ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. अहमदपूर तालुक्यातील हासरणी या गावातील ४० घरांमध्ये पाणी शिरल्याने तेथील कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवले. दुसरीकडे, विदर्भातील गडचिरोली व चंद्रपुरात गत २४ तासात जोरदार, तर यवतमाळ व भंडाऱ्यात मध्यम प्रमाणात पाऊस झाला. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यात बकरी चारण्यासाठी गेलेल्या अहेमद जब्बार खान नामक व्यक्तीच्या अंगावर वीज पडल्याने मृत्यू झाला. तर साहेबराव विठ्ठल मोरे जखमी झाले. तर वर्धा जिल्ह्यात आष्टी तालुक्यातील जैतापूर शिवारात दुपारी वीज पडून २९ शेळ्या ठार झाल्या. जवळपास सर्वच जिल्ह्यात पावुस होत आहे. बचाव कार्य सुरू आहे. नदीकाठच्या नागरिकांना सक्त सुचना दिल्या पाहिजेत. शेतीचे झालेले नुकसानीचा मोठे असून यावर काही तरी उपायोजना करण्याची गरज आहे. तातडीने शेतकऱ्याच्या खात्यात नुकसान भरपाई जमा करण्याची गरज निर्माण झाली आहे. गणपतीने सर्वत्र पावुस पाडला असून आता नुकसान भरपाईचे काय असा प्रश्न समोर निर्माण झाला आहे.

# अहमदपूर विधानसभा मतदारसंघात अतिवृष्टीमुळे पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचे आदेश

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर – व चाकूर तालुक्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीत व्हिडिओकॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील सहभागी झाले होते. मागील दोन दिवसांपासून चालू असलेल्या अतिवृष्टीमध्ये विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी नागरिकांच्या संपर्कात राहून विविध ठिकाणी झालेल्या पूर परिस्थितीची पाहणी करत नागरिकांना धीर दिला. याबद्दल प्रशासनाचे कौतुक करत आभार मानले.

यावेळी बैठकीत ना. पाटील यांनी मागील दोन दिवसापासून होत असलेल्या अतिवृष्टी मुळे अहमदपूर व चाकुर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे, फळबागेचे, भाजीपाल्याचे, खुप मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे सरसकट तात्काळ पंचनामे करण्यात यावेत.



अनेक गावात नदी नाल्याचे पाणी घरात शिरल्यामुळे घरांची पडझड होवून नुकसान झालेले आहेत त्याचे पंचनामे करणे.

नदी काठच्या जमीनीमध्ये पाणी जावून जमीन खरडून गेली आहे त्यांचे तात्काळ पंचनामे करण्यात यावेत.

अहमदपूर व चाकुर तालुक्यातील गावातील पुलावर पाणी जावून गावांचा संपर्क तुटला आहे अशा गावांचा संपर्क करणे व नागरीकांना पुलावरुन जावू नये म्हणून जाहीर आवाहन करणे. तसेच पुलांच्या दुरूस्तीबद्दल प्रस्ताव सादर करणे.

दोन्ही तालुक्यातील पाझर तलाव, साठवण तलाव, सिंचन तलाव, पुर्ण क्षमतेने भरुन जात आहेत. कांही तलाव फुटले आहेत तसेच कांही तलावातील पाणी सांडवा फोडून काढून देण्यात आले आहेत. सदरील तलावांच्या दुरूस्तीचा प्रस्ताव सादर करावा.

मतदारसंघातील कोल्हापुरी बंधारे व सिमेंट नाला बंधा मांची पडझड झाली आहे. सदरील बंधारे दुरूस्तीचा प्रस्ताव सादर करणे.

मतदारसंघातील अनेक जिल्हा परिषद शाळे मध्ये पाणी जावून शाळेचे नुकसान झालेले आहे. अशा शाळांचे दुरूस्तीचे प्रस्ताव सादर करावे व शाळेची इमारत धोकादायक असल्यास वर्ग इतरत्र भरवण्यात यावेत.

मतदारसंघातील गावा गावांना जोडणारे रस्ते पावसामुळे खचल्यामुळे गावांचा संपर्क तुटला आहे. तरी सदरील रस्ते दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करावा.

अनेक गावातील घरामध्ये पाणी जावून नागरिकांचे नुकसान झाले आहे अशा नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करुन त्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी.

मतदार संघातील अनेक गावामध्ये पोल पडल्यामुळे व तार तुटल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत झाला आहे अशा गावामध्ये तात्काळ विद्युत पुरवठा चालु करण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

मतदार संघातील गाव खेड्यामध्ये बंद असलेल्या बसेस चालू करुन नागरीकांची गैरसोय दुर करावी.

मतदारसंघातील अनेक गावांमधील अंतर्गत रस्ते व नाल्या खचल्या आहेत. यामुळे गावात पाणी शिरुन नुकसान झाले आहे. या नाल्या जेसीबी व्दारे खुल्या करुन पाणी काढून देणे व नाल्या दुरूस्ती करणेचा प्रस्ताव सादर करणे.

अहमदपूर व चाकूर शहरातील गटारी तुंबल्यामुळे पाणी शहरातील मुख्य रस्त्यांवर आले आहे या गटारी जेसीबी व्दारे खुल्या करण्यात याव्यात.

मतदार संघात अतिवृष्टीमुळे रोगराई (डेंगू मलेरिया) पसरण्याची भिती आहे. तरी नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून उपाय योजना करणे.

वरील सर्व विभागाच्या एकत्रीत नुकसानीचा मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे तात्काळ सादर करावा, अशी सूचना केली. बैठकीला जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर , उपविभागीय जिल्हाधिकारी मंजुषाताई लटपटे , अहमदपूर तहसीलदार उज्वलाताई पांगरकर, तहसीलदार नरसिंग जाधव, अहमदपूर व तालुका कृषी अधिकारी, सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक नागरिकांकडून दहा जणांची सुखरूप सुटका

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ आणि अहमदपूर तालुक्यांत पूरपरिस्थितीत अडकलेल्या दहा व्यक्तींची स्थानिक आपत्ती व्यवस्थापन पथक आणि नागरिकांनी २८ ऑगस्ट रोजी यशस्वीपणे सुटका केली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने कारवाई करत पथकाने ही बचाव कार्ये यशस्वीरीत्या पूर्ण केली. खबरदारीचा उपाय म्हणून भारतीय सैन्याचे एक पथक लातूरला पाचारण करण्यात आले आहे. शिरूर अनंतपाळ येथे नदीकाठावरील शेडमध्ये अडकलेल्या पाच व्यक्तींना स्थानिक पथकाने सुखरूप बाहेर काढले. अहमदपूर तालुक्यातील मौजे काळेगाव येथील साठवण तलावाच्या सांडव्यावर अडकलेल्या एका व्यक्तीची तातडीने सुटका करण्यात आली.

शिरूर अनंतपाळ येथील घरणी नदीवरील पुलाच्या बांधकामादरम्यान पाण्यात अडकलेल्या तीन मजुरांना स्थानिक पथकाच्या मदतीने सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. तसेच, मौजे माकणी येथे गावाजवळील पुलावरून जाताना पाण्यात वाहत गेलेल्या दौलत गोपाळ डोंगरगावे यांना स्थानिक गावकऱ्यांनी वाचवले. त्यांना किरकोळ दुखापती झाल्याने शिरूर ताजबंद येथील साईकृपा रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा जिल्हा नियोजंन समिती सभागृहात पार पडली. या कार्यशाळेला मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी. डी. वाघ, प्रमुख वक्ते रवींद्र माने (सरपंच, माण्याची वाडी, सातारा) आणि श्री. पांगळ (संचालक, पीआरटीसी, मुरुड) उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली, त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी प्रास्ताविकात अभियानाची मूलभूत संरचना, बक्षिसाची रक्कम आणि उद्दिष्टांबाबत माहिती दिली. श्री. पांगळ यांनी अभियानाच्या घटकनिहाय गुणांचे महत्त्व आणि जास्तीत जास्त गुण मिळवण्यासाठी करावयाच्या कामांबाबत मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते श्री. माने यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रीय अनुभवांचे कथन करत लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना अभियानात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबवले जाणार आहे. अभियान कालावधीत विभागीय आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान केले जातील.

## जलसंधारणासाठी शिरपूर पॅटर्नचे डॉ. सुरेश खानापूरकर यांचा औसा मतदारसंघाचा नियोजनात्मक पाहणी दौरा





**औसा/प्रतिनिधी :** आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने औसा मतदारसंघात जलसमृद्ध औसा अभियान हाती घेण्यात आले असून या अनुषंगाने काही दिवसांपूर्वीच औसा येथे जनसंकल्प मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कामाला अधिक गती देण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने जलसंधारण क्षेत्रातील आदर्श ठरलेल्या शिरपूर पॅटर्नचे मुख्य शास्त्रीय मार्गदर्शक, ज्येष्ठ भूगर्भशास्त्रज्ञ तथा जलसंधारण तज्ज्ञ डॉ. सुरेशजी खानापूरकर व सेवानिवृत्त न्यायमूर्ती तथा जलतज्ज्ञ श्री. अंबादासजी जोशी यांच्यासह आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघातील काही गावांचा दौरा केला.

शुक्रवार (दि.२९) रोजी औसा मतदारसंघातील हिप्परगा, कवळी व माळकोंडाजी, दावतपूर, मोगरगा व तांबरवाडी या गावांना आमदार अभिमन्यू पवार, डॉ सुरेश खानापूरकर, अंबादास जोशी भेट देऊन जलसंधारणाशी निगडित बाबींचा आढावा घेतला आणि शेतकरी बांधवांशी संवाद साधला. जलसमृद्ध औसा अभियानाच्या माध्यमातून जलसंधारण आणि उत्तम जलव्यवस्थापन प्रणाली विकसित करून शेतकऱ्यांच्या अर्थकारणात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा संकल्प केला आहे. यावेळी डॉ सुरेश खानापूरकर यांनी शिरपूर पॅटर्न च्या कामाची माहिती देत भविष्याच्या दृष्टीने पाणी नियोजन किती महत्त्वाचे आहे हे सांगितले तर आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघातील प्रत्येक गावात या अभियानाअंतर्गत या दहा वर्षांत काम केले जाणार आहे.

प्रत्येक वर्षांत किमान दहा ते पंधरा गावात या अभियानाअंतर्गत काम होणार असून या कामासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे.

मतदारसंघ जलसमृद्ध करण्याचे हे लोककल्याणकारी काम असून सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी केले.तसेच युवा, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक यांच्या सहभागातून जलसमृद्ध औसा अभियानाला जनचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

### ऐन गणेशोत्सवात सोन्याच्या दराने गाठला उच्चांक


**मुंबई/प्रतिनिधी :**गेल्या काही दिवसांपासून सातत्याने सोन्याच्या दरात वाढ होताना दिसतेय. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अनेक ग्राहकांचा बाप्पाचे दागिने किंवा इतर दागिने खरेदी करण्यावर भर असतो. मात्र ऐन सणासुदीच्या हंगामातच सोनं महाग झाल्याने ग्राहकांच्या चिंतेत वाढ झाली आहे. सोन्याचे दर एक लाखांच्या वर पोहोचले आहे. आज २४ कॅरेट सोन्याच्या दरात ७१० रुपयांची वाढ झाली असून १,०३,३१०च्या आसपास सोन्याचे दर पोहोचले आहेत. २२ कॅरेट सोन्याच्या दरात ६५० रुपयांची वाढ झाली असून ९४,७००रुपयांवर स्थिरावले आहे. १८ कॅरेट सोन्याच्या दरात ५३० रुपयांची वाढ झाली असून ७७४८० रुपयांवर स्थिरावलं आहे.

# वृक्षतोड रोखण्यासाठी झाडातून अवतरले गणराय!

## लातूरच्या वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाचा देखावा ठरतोय आकर्षक

**लातूर/प्रतिनिधी :** दिवसेंदिवस वाढत चाललेली वृक्ष तोड यामुळे पर्यावरण विषयक अनेक समस्या उद्भवत आहेत. वृक्षांची खुलेआम होत असलेली कत्तल याकडे लक्ष वेधण्यासाठी लातूरच्या वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाने देखावा सादर केला आहे. झाडावर माणूस कुऱ्हाड उगारात असताना झाडाच्या बुंद्यातून चक्क गणराय अवतरले आणि होत असलेली वृक्षतोड गणराय थांबवत आहेत, असा हुबेहूब देखावा साऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. शहरातील राजीव गांधी चौक परिसरात हा गणेश मंडळ स्थापन करण्यात आला आहे.

''मी दगडात नाही, मी देवळात नाही तर मी झाडात आहे'' ही टॅगलाईन घेऊन २०१६-१७ या वर्षापासून लातुरात झाडाचा गणपती साकारला जातो. गतवर्षी राज्य शासनाचा पुरस्कार या गणेश मंडळाला मिळाला आहे. वर्षभर वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने विधायक उपक्रम राबविले जातात. शिवाय, गणेश उत्सव कालावधीत १० दिवस विविध स्पर्धा, सामाजिक आणि ज्वलंत विषयांवर प्रबोधन केले जाते. एका झाडावर जेंव्हा




माणूस कुऱ्हाड उगारतो तेंव्हा झाडातून गणपती बाप्पा अवतरतात आणि झाडाला वाचवितात, असा लक्षवेधी देखावा या मंडळाने साकारला आहे. यातून वृक्षतोड




थांबविण्याचे आवाहन केले जाते आहे. शिवाय, गणेश मंडपात ऑक्सिजनचे महत्व सांगणारा देखावाही आकर्षण ठरतो आहे.

गणपती बाप्पाचा प्रसाद म्हणून फळ झाडं आणि कापडी पिशवी भेट

गणेश उत्सव खऱ्या अर्थाने वृक्ष उत्सव म्हणून साजरा व्हावा यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम या मंडळाच्या वतीने राबविले जातात. आलेल्या भक्तांना गणपती बाप्पाचा प्रसाद म्हणून एक फळाचे झाडं आणि कापडी पिशवी भेट दिली जाते. प्लास्टिकचा वापर टाळावा यासाठी या माध्यमातून प्रबोधन केले जाते आहे. शिवाय, गणपती बाप्पांच्या नावाने प्रत्येकाने किमान एक झाडं लावून बाप्पांच्या नावाने संवर्धन करावे असे आवाहन केले जात आहे.

''एक गणेश मंडळ : ५१ वृक्ष'' उपक्रमाला मंडळांचा प्रतिसाद

गणेश उत्सव काळात वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळाच्या पुढाकाराने एक गणेश मंडळ-५१ वृक्ष हा अभिनव उपक्रम हाती घेऊन ज्या गणेश मंडळाकडे वृक्ष लागवड करण्यासाठी जागा उपलब्ध आहे अशा गणेश मंडळाना प्रत्येकी ५१ रोपं मोफत दिली जात आहेत. या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळत असून, ७८ गणेश मंडळत यात सहभागी झाले आहेत. हरित लातूरसाठी गणेश मंडळानी एकत्र यावे, असे आवाहन वसुंधरा गणेश मंडळाने केले आहे.

झाडातून अवतरले गणराय, उंदीर मामाने धरली कुऱ्हाड!

दरवर्षी वसुंधरा प्रतिष्ठान लातूर संचलित वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने अनोख्या पद्धतीने गणेश उत्सव साजरा केला जातो. कोणाकडून वर्गणी न घेता पदाधिकारी स्वतः जमेल तितकी रक्कम जमा करून गा उत्सव साजरा करतात. झाडाचा गणपती ही संकल्पना देशात सर्वप्रथम या मंडळाने आणली. यंदा वृक्षतोड याकडे लक्ष वेधण्यासाठी आकर्षक देखावा मंडळाने सादर केला आहे. झाडं तोडत असताना त्या झाडातून गणपती बाप्पा अवतरले झाडं तोडण्यापासून रोखत आहेत असा हा देखावा सर्वांचे आकर्षण ठरतो आहे. कुऱ्हाडीला उंदीर मामा पकडून वृक्षतोड रोखण्यास गणपती बाप्पाला मदत करत आहे, याचे कुतूहल वाटते आहे.

# डिसन रोग



(बाह्यकज-प्रवर्तक-न्यूनता). अधिवृक्काच्या फ अधिवृक्क ग्रंथि बाह्यकात (बाह्य स्तरात) उत्पन्न होणार्या प्रवर्तकाचे (रक्तात मिसळणार्या उत्तेजक स्रा-वाचे) न्यूनत्व अथवा अभाव झाल्यामुळे उत्पन्न होणार्या रोगाला 'डिसन रोग' असे म्हणतात. टॉमस डिसन यांनी या रोगाचे प्रथम वर्णन केले, म्हणून या रोगाला त्यांचे नाव पडले हा रोग वयाच्या तिशीपूर्वी व साठीनंतर सहसा आढळत नाही. अधिवृक्क बाह्यकात क्षयजंतूचा संसर्ग झाल्यानेच हा रोग होतो, अशी पूर्वी समजूत होती. अधिवृक्कावरील शस्त्रक्रिया, जंतुसंसर्ग आणि अर्बुदोत्पत्ती (पेशींच्या अतिरिक्त वाढीमुळे होणारी निरुपयोगी गाठींची उत्पत्ती) या कारणांनीही हा रोग होतो. सापेक्षतः ह्या रोगाचे प्रमाण अगदी अल्प असते.

अधिवृक्क-बाह्यकात उत्पन्न होणारी कॉर्टिकॉइड, ग्लुकोकॉर्टिकॉइड, स्त्री-मदजन (एस्ट्रोजन) आणि पौरुषजन (अँड्रोजन) ही प्रवर्तके या रोगात मुळीच उत्पन्न होत नाहीत किंवा अगदी स्वल्प प्रमाणातच उत्पन्न होतात.

लक्षणे : त्वचेचा रंग बदलून ती काळपट तपकिरी रंगाची होते. अशक्तता, भूक न लागणे, मळमळ, ओकार्या, शरीराचे वजन कमी होऊन अत्यंत अशक्तपणा येणे, रक्तदाब कमी होणे, पांडुरोग (रक्तातील तांबड्या पेशींचे, हीमोग्लोविनाचा किंवा दोहोंचे प्रमाण अथवा रक्ताचे एकूण घनफळ कमी झाल्यामुळे होण-ारा रोग) आणि मानसिक औदासीन्य ही लक्षणे दिसतात. लक्षणे उत्त- ारोत्तर वाढतच जातात. त्वचेच्या आध- ारस्तरात कृ ष्णरंजक (काळपट रंग, मेलॅनीन) पदार्थ अधिक साठून राहिल्यामुळे त्वचा काळपट तपकिरी दिसू लागते. चेहरा, मान, हाताची मागची बाजू, कंबर, तोंडातील श्लेष्मकला (नाजूक अस्तर) व हिरड्या या सर्व ठिकाणी त्या रंगाचे डाग दिसू लागतात व ते वाढत जा-तात. रक्तात सोडियम व क्लोराइड यांचे प्रमाण फार कमी होते, पोटॅशियमाचे प्रमाण वाढते. रोगाच्या लक्षणांचे आवेग (झटके) येतात व त्या आवेगांच्या वेळी हे रक्तदोष अधिक दिसतात. त्वचेचा रंग, रक्तदाब कमी होणे व आत्यंतिक अशक्तता यांमुळे रोगाचे निदान करणे शक्य होते. मूत्र व रक्तपरीक्षेची निदानाला मदत होते.



चिकित्सा : पोटात मीठ अधिक प्रमाणात दिल्यास किंवा नीलेतून मिठाच्या विद्रावाचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) केल्यास प्रकृती सुधारते. या रोगावर १९२९ पर्यंत परिणामकारक उपाय उपलब्ध नव्हता, त्यामुळे एकदा रोग झाला की सर्व रोगी दगावत. त्या वर्षी स्विंगल आणि फायफर यांनी जनावरांच्या अधिवृक्क-बाह्यकाचा अर्क तयार करून त्याचे रोग्यांत अंतःक्षेपण केले, त्याचा परिणाम चांगला दिसू लागला. या अर्काचे फार मोठ्या प्रमाणात अंतःक्षेपण करावे लागे, ही मोठी अडचण होती. त्यानंतर ष्ठकॉर्टिसोन, डेसॉक्सिकॉर्टिकोस्टेरोन वगैरेंचा शोध व उत्पादन होऊ लागल्यापासून त्यांचे अंतःक्षेपण केल्यास अथवा पोटात गोळ्या दिल्यास पुष्कळ गुण येतो. कॉर्टिसोनापासून तयार केलेली अनेक औषधेही गुणकारी ठरलेली आहेत. डेसॉक्सिकॉर्टिकोस्टेरोन सिटेट या पदार्थांच्या गोळ्यांचे त्वचेखाली रोपण केल्यासही (आत ठेवल्यासही) गुण येतो. हा गुण सहा ते आठ महिने टिकू शकतो. त्यानंतर पुन्हा रोपण करावे लागते.ढमढेरे, वा. रा.

# रानभाज्या



महाराष्ट्रातील रानभाज्यांचा विचार करता कोकणात पावसाला सुरुवात झाली की, कोणत्याही प्रकारची लागवड न करता आपोआप रुजून येतात. ही कोकणवासीयांना निसर्गाने दिलेली विनामूल्य देणगी आहे, असे म्हणता येईल. या रानभाज्या आरोग्यासाठी गुणकारी आहेत. यासाठी कोणत्याही प्रकारच्या रासायनिक खतांचा वापर केला जात नाही. तेव्हा निसर्गाने दिलेल्या रानभाज्या यांचा नक्कीच पावसाळ्यात आस्वाद घायला हवा. त्यासाठी कोकणात जावे लागेल. याच रानभाज्या शहरात घ्यायच्या झाल्यास त्यासाठी पन्नास ते साठ रुपये मोजावे लागतील. मात्र ती रानभाजी ताजी असेलच असे नाही. कारण या रानभाज्यांची चवच काही न्यारी असते. कोकणात पूर्वी घरात काही नसल्यास अशा रानभाज्या उकडून खात असत. अजूनही काही ग्रामीण भागात घरी जर पाहुणे मंडळी आली, तर त्यांना आल्यावर ग्लासात पेज व भाजी देण्याची पद्धत आहे.

रानभाज्यांचा विचार करता कोणत्याही प्रकारची शेती किंवा बियाणे न पेरता पावसाळ्यात पाऊस पडल्यावर निसर्गतःच उगवल्या जाणाऱ्या भाज्या म्हणजे रानभाज्या असे आपण म्हणतो. या रानभाज्या जंगलात, शेत जमिनीच्या कडेला, माळावर, बांधाच्या बाजूला उगवतात. अशा रानभाज्या आरोग्याला पोषक असतात. कोकणात अशा अनेक प्रकारच्या रानभाज्या आहेत मात्र त्याविषयी पुरेशी माहिती नाही; परंतु ज्या रानभाज्या माहीत आहेत. त्याची थोडक्यात माहिती घेऊया.

अळू हे कोकणात घराच्या परिसरात उगवते.

करटोली (भागला) : करटोलीची रानभाजी घनदाट जंगलातील खडकाळ भागात आढळते.

शेवरा : पाऊस लागल्यावर तीन-चार दिवसांत शेवराचा कोंब डोंगराच्या बाजूने दिसतो. लांबून केळीसारखा फुटल्यासारखा दिसतो.

टाकळा : कोकणात पहिल्या पावसाळ्यात ही भाजी उगवते.

टाकळा : कोकणात पहिल्या पावसाळ्यात ही भाजी उगवते. टाकळ्याचे रोपटे एक फुटाचे झाले की, तिची कोवळी पाने खुटून आणावीत. ती स्वच्छ पाण्यात धुवून विळीवर बारीक कापली जातात. नंतर ती थव्यावर सुखी भाजी केली जाते. भाकरीबरोबर टाकळ्याची भाजी खायला खूप चांगली लागते. ही भाजी रस्त्याच्या कडेला, रानात विपुल प्रमाणात आढळते. फक्त कोवळी पाने खुटून आपल्याला आणावी लागतात. भाजीचा वास खमंग येतो. पचायलाही सुलभ असते.

शेवरा : पाऊस लागल्यावर तीन-चार दिवसांत शेवराचा कोंब डोंगराच्या बाजूने दिसतो. लांबून केळीसारखा फुटल्यासारखा दिसतो. मात्र त्याला एकच केळीच्या पानासारखा; परंतु लहान एक ते दीड फुट लांबीचे असते. त्यात एक बारीक काठीसारखे निमुळते केसर असते. ते काढून उन्हात सुखवावे लागते. त्यानंतर बारीक करून त्याची भाजी केली जाते. या भाजीला खाज येते, त्यामुळे खाज येऊ नये म्हणून कोकम घातले जाते. बऱ्याच वेळा मटण ज्या पद्धतीने करतात. त्या पद्धतीने भाजी केली जाते. त्यामुळे खाताना मटणासारखी भाजी लागते.

करटोली (भागला) : करटोलीची रानभाजी घनदाट जंगलातील खडकाळ भागात आढळते. पाऊस लागल्यावर काल्र्याच्या हिरव्यागार वेलीसारखी असते. कोकणात भागला असे म्हणतात. ती सुद्धा खडकाचा आधार घेऊन वाढत असते. कारल्याची पाने, फुले व फळे यासाखी दिसायला असतात. मात्र कारल्याची मोठी भागल्याची लहान फळे असतात. हिरवीगार असताना बघायलाही खूप छान दिसतात. जवळ जवळ पंधरा दिवसांनंतर भागल्याची भाजी करू शकतो. एका वेलीवर चार ते पाच भागला मिळू शकतात. त्यासाठी माहीतगार व्यक्ती असावी लागते. त्यामुळे कोणत्या भागात भागला लागतात याची माहिती असते. बऱ्याच वेळा भटकंती करावी लागते. मुख्य ओळख म्हणजे तिच्या वेलीवर नक्षीदार पिवळी फुले असतात. त्यामुळे शोधायला वेळ लागत नाही. काही ठरावीक ठिकाणी असतात. कोवळी भागला घरी आणून स्वच्छ धुतल्यावर कारल्याची भाजी जशी आपण करतो, तशी करावी. शक्यतो लोखंडी तव्यावर करावी. त्यामुळे अधिक चविष्ट लागतात. शहरात सुद्धा महिन्यानंतर ही भाजी येते. मात्र त्यासाठी एक किलोमागे दोनशे रुपये मोजावे लागतात. बरेच लोक ही भाजी आवडीने खातात.

अळू : अळू हे कोकणात घराच्या परिसरात उगवते. तिचा देठ लांब असून पान गोलाकार असते. बऱ्याच वेळा अळूमध्ये शेंगदाणे, चणे घालून पातळ भाजी केली जाते. तसेच अळ-ूची पाने एकत्र करून उकडली जातात. त्यानंतर त्याचे अळूवडे करतात. त्यात कोकम किंवा चिंच टाकावी म्हणजे अधिक स्वादिष्ट होते. चाकरमानी पावसाळ्यात गावी गेल्यावर अळूची भाजी आवडीने करायला सांगतात. सध्या शंभर रुपयात रेशन दुकानावर धान्य जरी मिळाले तरी पावसाळ्यात अनेक लोकांचे उदरनिर्वाह अळू भाजी करीत असते. शहरात आवडीने विकत घेऊन लोक खात असतात. पावसाळ्यात आपण अळूचे दोन ते तीन महिने व्यवसाय करू शकतात.

अळंबी : कोकणात पावसाळ्यात जुलै महिन्याच्या मध्यानंतर रानात अळंबी उगवतात. बऱ्याच वेळा करवंदीच्या झाळीत, बंधाऱ्याच्या बाजूला किंवा बांबूच्या बेटाच्या बाजूला अळंबी येतात. लांबून पांढरीशुभ्र व छत्रीच्या आकारासारखी दिसतात. मात्र त्यावर मुसळधार पाऊस पडता काम नये अन्यथा पूर्ण जमिनीवर गळून जातात. नंतर ती खाण्यालायक नसतात. तसेच माळावर मेरेच्या बाजूला पहिला कुंडा दिसतो नंतर दुसऱ्या दिवशी बारीक अळंबी येतात. त्यांना कोकणात चितयाळी अळंबी म्हण-तात. हिचा पण रसा चविष्ट लागतो. हल्ली भातयान गवतामध्ये बी रुजवून अळंबी तयार केली जातात. मात्र रानातल्या अळंबीचा नादच काही निराळा असतो.

या व्यतिरिक्त भारंगी, सुरण, कुडा, घोळ, बांबूचे कोम इत्यादी रानभाज्या निसर्गनिर्मित असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितकारक व गुणकारी आहेत. तेव्हा अशा नैसर्गिक रानभाज्या आपण पावसाळ्यात कोकणात येऊन अवश्य खायला हव्यात. तेव्हा चला तर कोकणात रानभाज्यांचा आस्वाद घेऊया.

-रवींद्र तांबे

# भाषा : संवेदनांचे चांदणे

खूप वर्षांनी मला दोन पुस्तके आठवली. अरुण लिमये यांचे 'क्लोरोफॉर्मख्र' आणि अजित दळवी यांचे 'डॉक्टर तुम्हीस-ुद्धा'!ख्र वैद्यक विश्वाची पडझड लिमये यांनी आत्मकथनातून साकारली आहे. वैद्यक विश्वातील नितीमत्ता या पुस्तकाच्या माध्यमातून चक्रव्यूहात सापडली. डॉक्टर तुम्हीसुद्धा हे नाटकही गाजले ते त्यातून वैद्यक क्षेत्रातील भ्रष्टतेचे वास्तव प्रकाशात आणले म्हणून! एक चांगला डॉक्टर नितीमान हवा, तर तो समाजाला उत्तम सेवा देऊ शकेल.

सायन्स शाखेकडे गेलेल्या विद्यार्थ्यांना भाषा या विषयाचे ओझे वाटते. त्यांच्या अभ्यासक्रमातून भाषा वजा होत जाते. मेडिकलच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामधून भाषा जणू हद्दपार झाली. पण त्यांना भाषेद्वारा प्राप्त होणारी संवेदनशीलतेची गरज आहेच ना. या संवेदनशीलतेची जोड लाभली, तर डॉक्टर अधिक चांगला माणूसही होईल. किडनीसारख्या अवयवांच्या व्यापाराची चर्चा वृत्तपत्रांमधून होते, तेव्हा तेव्हा डॉक्टरांच्या संवेदनाहीनतेचा प्रश्न ऐरणीवर आलाच आहे. नितीमत्तेची बैठक फक्त डॉक्टरांकरताच नाही, तर सर्व क्षेत्रांमध्ये गरजेची आहेच. ही बैठक साहित्य अप्रत्यक्षपणे देत असते.

कविता मनाला अधिक तरल पैलू देतात. आत्मकथने माणसाला खंबीर बनवतात. संघर्षाचे महत्त्व रुजवतात. परिस्थितीतून वाट काढायला शिकवतात. ललित लेख छोटेसे क्षणही सजीव करतात. निसर्गाचे सौंदर्य वाचायला शिकवतात. चरित्र आदर्श उभे करतात. कथा कल्पिताचा अवकाश विणत जाते. कोणतीही साहित्यकृती रंगीबेरंगी आयुष्याचा लोलक आपल्या हाती ठेवते. विविध कोनांतून जीवन पाहायला शिकवते. 'हसरे दु:खख्र' हे भा. द. खेर लिखित चार्ली चॅप्लिनचे पुस्तक मला खूप आवडून गेले आहे. उभ्या जगाला हसवणारा हा विनोदवीर प्रत्यक्षात इतक्या दु:खातून जाऊ शकतो? मंगला निगुडकर यांनी केलेला डायरी ऑफ न फ्रँक या पुस्तकाचा अनुवाद अवघ्या १३ वर्षांच्या ज्यू मुलीचा जी-वनप्रवास रेखाटतो. साहित्य नि भाषेला निरुपयोगी समजणाऱ्या माणसांची कीव वाटते. भाषेची स्पंदने माणसाला खऱ्या अर्थाने जिवंत ठेवतात. त्याला जगवतात. जग पाहायला शिकवतात. संवेदनांचे चांदणे पेरत जातात. **मायभाषा: डॉ. वीणा सानेकर**

## गरोदर स्त्रियांनी मीठाचं सेवन — डॉक्टर टीप्स



गरोदरपणात जेव्हा शरीरात मिठाची कमतरता भासते तेव्हा शरी-राचे अनेक भाग नीट काम करत नाहीत. मीठाच्या कमतरतेमुळे शरीरात खूप अशक्तपणा आणि थकवा येतो, ज्यामुळे तुम्हाला गरोदरपणात त्रास होऊ शकतो. सोडियम आपल्या शरीरात द्रव पदार्थ वाढविण्यास मदत करते. गरोदरपणात वाढत्या विरोधाला समर्थन देण्यासाठी द्रव पदार्थाची आवश्यकता असते. अशा वेळी सोडियमची कमतरता असेल तर द्रवपदार्थाचीही कमतरता भासू शकते. २० व्या आठवडे झालेत बाळाने किक मारायला सुरूवात केलीय का? जाणून घ्या किती होते बाळाची वाढ? गरोदरपणात मीठ खाण्याचे तोटे

जर तुम्ही जास्त प्रमाणात मिठाचे सेवन करत असाल तर शरीरातील पाणी कमी होण्याची समस्या देखील उद्भवू शकते. (**क्रमशः पुढील अंकात**)

## विनोद




नोकरी :
माझ्याशी लग्न करण्यास तू नकार का देते आहेस? 'लग्नानंतर माझे प्रेम कायम टिकेल असे तुला वाटत नाही का?' अनिलने तिला विचारले.
'तुझी नोकरी कायम टिकेल असे वाटत नाही.' ती शांतपणे म्हणाली.

## संदेश

Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur shara-bat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?
Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neem-boo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## सुविचार




प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.
– पु.ल. देशपांडे

### संस्कृत सुभाषित

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीम ताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

**अर्थ** –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रा-तवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत






# जॉली एलएलबी-३ ला रिलीज पूर्वीच मिळाला मोठा झटका

मुंबई-वकील नीरज कुमार यांनी बिहारच्या पाटणा उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे, ज्यामध्ये मजॉली एलएलबी-३फ चित्रपट आणि त्यातील गाणी आणि प्रमोशनल कंटेंटवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. त्यांनी आरोप केला आहे की, चित्रपटात न्यायव्यवस्थाचे अपमानजनक आणि अवमानकारक पद्धतीनं चित्रण करण्यात आले आहेत.

यामुळं वकिलांची आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा दुखावली जात आहे. याचिकाकर्त्यानं अलीकडेच प्रदर्शित झालेलं गाणं ममेरा भाई वकीलफ आणि चित्रपटाच्या ट्रेलरमधील वादाचे मुख्य कारण दाखवून दिले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, न्यायव्यवस्था आणि कायदे यांना हास्यास्पद पद्धतीनं दाखवण्यात आले. यामुळे फक्त वकिलांची प्रतिष्ठाच खराब होत नाही तर जनतेमध्ये न्यायव्यवस्थेची प्रतिमाही खराब होत असल्याचा आरोप वकील नीरज कुमार यांनी लावले आहेत.

उच्च न्यायालयात काय मागणी करण्यात आली : याचिकेत उच्च न्यायालयात मागणी करण्यात आली होती की, वादग्रस्त गाणं आणि ट्रेलरवर तात्काळ बंदी घालावी. तसेच, चित्रपट निर्मात्यांना बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि बिहार राज्य बार कौन्सिलची परवानगी घेऊन आवश्यक संपादने करावे. चित्रपटातील गाणे आणि प्रमोशनल मटेरियलमध्ये वकीली व्यवसाय हास्यास्पद पद्धतीनं दाखवण्यात आल्यानं आता मजॉली एलएलबी-३फ हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे.

# अभिनेता सुबोध भावे यांच्या घरी बाप्पाचे आगमन....देखाव्यातून दिला हा सामाजिक संदेश

पुणे,-गणपती बाप्पा मोरया मंगल मूर्ती मोरयाच्या जयघोषात आज मोठ्या उत्साहात पुण्यात गणपती बाप्पाच आगमन झालं आहे. पुण्यात मानाच्या पाचही गणपती मंडळाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली असून आज बाप्पाच्या आगमन मिरवणुकीला मोठ्या संख्येनं पुणेकर सहभागी झाले होते. मानाच्या गणपती मंडळाच्या बरोबर घरगुती बाप्पाचे देखील आगमन उत्साहात झाले आहेत. अश्यातच अभिनेता सुबोध भावे यांनी देखील आपल्या घरी गणरायाचे आगमन करत प्राणप्रतिष्ठापना केली आहे. अभिनेता सुबोध भावे यांनी त्यांच्या घरी सकाळच्या वेळेस बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना केली. यावेळी अभिनेत्याच्या घरी कार्तिक स्वामी आणि गणपती बाप्पा यांच्यात झालेल्या स्पर्धेबाबत देखावा साकारला गेला आहे.



अभिनेता सुबोध भावेच्या घरी गणेशाचं आगमन : यावेळी अभिनेता सुबोध भावे म्हणाले की, ही आमच्या घरातील मुलांची संकल्पना आहे की यावर्षी हा देखावा करण्यात यावा. गोष्ट खूप छोटी आहे पण गणपती बाप्पाच्या आयुष्यातील आहे. कार्तिक स्वामी आणि त्यांच्यात स्पर्धा लागते की पृथ्वीला तीन प्रदीक्षणा घालायची, तेव्हा कार्तिक स्वामी जातात पण गणपती बाप्पा आपल्या आईवडिलांच्या भोवतीच प्रदक्षिणा घालतात आणि सांगतात की माझ्यासाठी माझं जग हे माझे आई वडील आहे. ही एवढी मोठी शिकवण बाप्पाच्या छोट्याशा गोष्टीनं मिळत असते, जे आपले जन्मदाते आहे, ज्यांनी आपल्याला जन्म दिल आहे. त्याचं सांभाळ करणे म्हणजे पृथ्वीचा सांभाळ करणे आहे. आज अनेक लोक आपल्या आई वडिलांचे सांभाळ करत नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. पण आपल्या आई वडिलांचे सांभाळ करणे हे आपलं कर्तव्य आहे असं यावेळी भावे म्हणाले.

सुबोध भावेनं व्यक्त केल्या भावना : पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीबाबत जो वाद सुरू होता त्याबाबत भावे यांना विचारले असता ते म्हणाले की, मला त्याबाबत काहीच माहीत नाही पण गणेशोत्सव विसर्जन मिरवणुक लवकर संपली पाहिजे या मताचा मी आहे. दुसऱ्या दिवशी अमावास्या असल्याने जी वेळ विसर्जनाची आहे त्याच वेळेस विसर्जन व्हायला पाहिजे अस यावेळी ते म्हणाले.

# दीपिका - रणवीर सिंग यांची मुलगी दुआचा व्हिडिओ व्हायरल



मुंबई -अभिनेत्री दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग हे बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय स्टार्सपैकी एक आहेत. दोघेही स्टार पॅप्स आणि चाहत्यांच्या खूप जवळचे आहेत. दीपिका आणि रणवीर आपल्या चाहत्यांबरोबर सेल्फी काढण्यास कधीही मागे पुढं पाहत नाहीत. मात्र मुलगी दुआ हिचा चेहरा त्यांनी आतापर्यंत कोणाला दाखवला नाही. या जोडप्यानं सप्टेंबर २०२४मध्ये पहिलं बाळ दुआचं जगात स्वागत केलं. आता दुआ लवकरच १ वर्षाची होत आहे. आतापर्यंत या जोडप्यानं मुलीचा चेहरा लपवून ठेवला आहे. दीपिका सार्वजनिक ठिकाणी गेली तर आपल्या मुलीचा चेहरा लपवून ठेवते. अलीकडेच एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, यामध्ये दुआचा चेहरा हा दिसत आहे. आता हा व्हिडिओ पोस्ट करणाऱ्या युजर्सवर लोक भडकले आहेत.

व्हिडिओमध्ये काय आहे? : या व्हिडिओमध्ये दीपिका मुलगी दुआला आपल्याबरोबर घेवून जाताना दिसत आहे. दीपिकाला कळताच तिचा आणि दुआचा व्हिडिओ बनवला जात आहे, ती थोडी अस्वस्थ झाली. त्यानंतर ती त्या व्यक्तीला व्हिडिओ बनवण्यापासून थांबविण्यात प्रयत्न करते. व्हिडिओमध्ये दीपिकानं दुआला आपल्या कडेवर घेतले आहे. दीपिका आणि दुआचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. यानंतर लोकांनी म्हटले की दुआ अगदी वडील रणवीरसारखी दिसते. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर रणवीर-दीपिकाचे चाहत्यांनी याला डिलीट करण्याची मागणी केली होती.


व्हिडिओवर यूजरने नाराजी व्यक्त केली : एका चाहत्याने या व्हिडिओच्या पोस्टमध्ये लिहिले,'आत्ताच दुआचा चेहरा पाहिला, दीपिकाने सांगितले की, तिला तिच्या बाळाचा चेहरा दाखवायचा नाही आणि तरीही एका चाहत्याला व्हिडिओ बनवण्याची गरज वाटली, व्हिडिओ क्लिपमध्ये तुम्ही पाहू शकता की, दीपिका आनंदी नाही आणि तरीही तुम्ही ते शेअर केले आहे.' आणखी एकानं लिहिलं, 'डिलिट करा ' दरम्यान दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग यांनी इटलीच्या सुंदर लेक कोमो येथे २०१८मध्ये लग्न केलं. या जोडप्याच्या लग्नाला कुटुंब आणि काही जवळचे मित्र उपस्थित होते. या दोघांचं लग्न कन्नड आणि सिंधी रितीरिवाजांनी झालं आहे. यानंतर दोघांनी मुंबईत एक भव्य रिसेप्शन दिलं होतं. या जोडप्याच्या लग्नाला ६ वर्ष झाले आहेत. यानंतर दोघांनी २०२४मध्ये गरोदरपणाची घोषणा केली. या जोडप्याला सप्टेंबरमध्ये दुआ झाली. आतापर्यंत या दोघांनी आपल्या मुलीचा चेहरा उघड केला नाही.



# "अभय'', योगी आदित्यनाथ यांच्या जीवनावर आधारित सिनेमाला हिरवा कंदील

मुंबई-उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या जीवनावर आधारित ''अजेय : द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी'' हा चित्रपट प्रदर्शित होण्याचा मार्ग अखेर मोकळा झालाय. सीबीएफसीनं सुचवलेल्या कट्समध्ये आम्हाला काहीही आक्षेपार्ह दिसलं नाही, असं स्पष्ट करत या सिनेमाला प्रदर्शनाकरता प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) न देण्याचा सीबीएफसी पुनर्विचार समितीचा विचार मुंबई उच्च न्यायालयात सोमवारी रद्द केलाय. त्यामुळं सिनेमाच्या निर्मात्यांना एक मोठा दिलासा मिळालाय.

खंडपीठातील दोन्ही न्यायमूर्तींनी पाहिला सिनेमा : याबाबत निकाल देण्यापूर्वी सिनेमा स्वत: पाहण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या दोन्ही न्यायमूर्तींनी घेतला होता. त्यानुसार न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठानं हा सिनेमा जातीनं पाहिला. पहिल्यांदा या सिनेमाला रिलिज प्रमाणपत्र नाकारताना सीबीएफसीनं २९ कट्स सुचवले होते. याविरोधात सिनेमाच्या निर्मात्यांनी पुनर्विचार समितीकडे याबाबत दाद मागितली होती. त्या समितीनं २९ पैकी ८ कट्स रद्द केले. मात्र तरीही १७ आक्षेपांच्या मुद्द्यावर या सिनेमाला प्रमाणपत्र देण्यास नकार देण्यात आला. याविरोधात सिनेमाच्या निर्मात्यांनी उच्च न्यायालयात नव्यानं याचिका दाखल करत दाद मागितली होती. सिनेमा पाहिल्यानंतर उच्च न्यायालयानं स्पष्ट केलं की, जिथं जिथं आक्षेप नोंदवले होते, तिथं तिथं थांबून आम्ही परत ते सीन पाहिले, संवाद नीट ऐकले, नोट्स लिहिल्या. त्यामुळं आम्हाला यात आक्षेपार्ह असं काहीच वाटलं नाही. सरतेशेवटी हा एक सिनेमा आणि तो सत्य घटनांवर आधारित असला तरी निर्मात्यांच्या कलात्मक कल्पकतेला त्यात थोडा वाव द्यायलाच हवा. त्यामुळं आम्हाला यात आक्षेप घेण्यासारखं काहीही वाटलं नाही, असं स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयानं या सिनेमाला प्रदर्शनाचं प्रमाणपत्र नाकारण्याचा सीबीएफसीचा निर्णय रद्द करत, सिनेमाला प्रमाणपत्र देण्याचं निर्देश उच्च न्यायालयानं सीबीएफसीला दिलेत.




सीबीएफसीकडून नियमबाह्य मुद्द्यावर अडवणूक होत असल्याचा निर्मात्यांचा आरोप : या सिनेमाला उत्तर प्रदेश मुख्यमंत्री कार्यालयाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल गेलेले नाही. या अजब कारणासह अन्य काही मुद्यांवर आक्षेप घेत सीबीएफसीने या चित्रपटाच प्रदर्शन प्रमाणपत्र अडवून ठेवलं होत. सिनेमॅटोग्राफी कायद्याअंतर्गत अन्य कायदेशीर पर्यायी उपलब्ध असले तरीही मुंबई उच्च न्यायालय त्यांच्या अधिकारात या याचिकेवर निर्णय घेऊ शकते, असे निर्मात्यांच्यावतीने जेष्ठ कायदेतज्ज्ञ रवी कदम यांनी उच्च न्यायालयाला सांगितले. सीबीएफसीने हे प्रमाणपत्र नाकारत चित्रपट निर्मात्यांच्या मूलभूत अधिकारांच उल्लंघन केलंय. एका खासगी व्यक्तीकडून (योगी आदित्यनाथ) ना हरकत प्रमाणपत्र घेण्यास सांगून सेन्सॉर बोर्डानं आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर जात निर्णय घेतल्याचा आरोपही निर्मात्यांकडून करण्यात आला होता.

काय आहे प्रकरण? : १ ऑगस्ट रोजी जगभरातील सिनेमागृहात हा सिनेमा रिलिज होणार होता. त्यासाठी सिनेमागृहांना पैसे देण्यात आले होते. त्यामुळं सिनेमा वेळेत प्रदर्शित न झाल्यानं आधीच निर्मात्यांच फार मोठ आर्थिक नुकसान झालंय, असा दावा याचिकाकर्त्यांकडून उच्च न्यायालयात करण्यात आलाय. याचिकाकर्त्यांनी ५ जून रोजीच मुख्य सिनेमाच्या प्रमाणपत्रासाठी सीबीएफसीकडे अर्ज केला होता. नियमानुसार, सीबीएफसीनं ७ दिवसांच्या आत अर्जाची छाननी पूर्ण करत १५ दिवसांच्या आत सिनेमा प्रदर्शनासाठी योग्य आहे की नाही?, यावर निर्णय घेण आवश्यक असत. या सिनेमाबाबत दीड महिना उलटून गेलाय, तरीही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, असा आरोप करत निर्मात्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर जुलै महिन्यात सुनावणी घेण्यात आली होती. तेव्हा कायद्यानं विहित केलेल्या वेळेत सिनेमाला प्रमाणपत्र देणं आवश्यक आहे. सेसॉर बोर्ड त्यापासून पळ काढू शकत नाही, अस स्पष्ट करत उच्च न्यायालयानं ही याचिका निकाली काढली होती. मात्र त्यानंतरही प्रमाणपत्र न मिळल्यानं निर्मात्यांनी पुन्हा एकदा उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते.


अजेय : द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी : हा सिनेमा योगा आदित्यनाथ यांच्या जीवनावर आधारीत एक बायोपिक सिनेमा आहे. यात अवंत जोशी या युवा कलाकारानं योगी आदित्यनाथ यांची मध्यवर्ती भूमिका साकारलीय. याशिवाय, या सिनेमात परेश रावल, दिनेश लाल यादव आणि राजेश खट्टर इतर महत्त्वाच्या भूमिकेत दिसतील. या सिनेमाचं दिग्दर्शन रवींद्र गौतम यांनी केलंय. रवींद्र गौतम हे छोट्या पडद्यावरील एक यशस्वी नाव आहे. कसौटी जिंदगी की, बडे अच्छे लगते है या मालिकांचं त्यांनी दिग्दर्शन केलंय. याशिवाय, 'महारानी - सीझन २' या वेब सीरीजच आणि 'एक्कीस तोफो की सलामी' या सिनेमाचंही त्यांनी दिग्दर्शन केलंय.

# कुंभमेळ्यातील व्हायरल गर्ल मोनालिसा या चित्रपटातून करणार पदार्पण

प्रयागराज,२७ ऑगस्ट (पीएसआय) प्रयागराज येथील कुंभमेळ्याच्या दरम्यान व्हायरल झालेल्या मोनालिसा या तरुणीचा चित्रपट लवकरच येतो आहे. प्रयागराज या ठिकाणी माळ विक्री करणाऱ्या मोनालिसाचं मूळ नाव मोनी भोसले असं आहे. तिचं सौंदर्य पाहून तिच्या सौंदर्याची भुरळ अनेकांना पडली होती. मोनालिसा ही मूळची इंदूर येथील आहे. महाकुंभमेळ्यात तिच्या लूकमुळे तिची चर्चा देशभरात झाली होती. याच मोनालिसाला चित्रपटाची ऑफर मिळाली आहे. तिचा चित्रपट आता लवकरच येतो आहे. मोनालिसा मल्याळम चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करते आहे.

कुठल्या चित्रपटात झळकणार मोनालिसा?

मोनालिसा नागम्मा या मल्याळम चित्रपटात झळकणार आहे. कैलाश या अभिनेत्यासह झळकणार आहे. पी. बिनू वर्गिस यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. तर जिली जॉर्ज यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. नागम्मा या चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होऊन ते सप्टेंबर महिन्याच्या शेवटापर्यंत संपणार असल्याची चिन्हं आहेत. या मल्याळम चित्रपटासंदर्भात जी पूजा करण्यात आली त्याचे फोटो मोनालिसा अर्थात मोनी भोसलेने पोस्ट केले आहेत.



## नवा लूक चांगलाच चर्चेत

कोण आहे मोनिलासा?

मोनिलासाचा एक व्हिडीओ जानेवारी महिन्यात चांगलाच व्हायरल झाला. त्यामुळे कुंभमेळ्यात तिचीही चर्चा रंगली. मोनालिसाचं सौंदर्य खरोखरच अप्रतिम आहे. मात्र तिच्यासह फोटो काढण्यासाठी, व्हिडीओसाठी, तिच्याशी बातचीत करण्यासाठी अक्षरश: त्रास दिला जातो आहोत. मोनालिसा माळा विक्रीचं काम करते पण तिच्या या व्यवसायावरही या सगळ्यामुळे परिणाम झाला आहे. प्रयागराजमध्ये गेल्यानंतर तिला प्रसिद्धी मिळाली. पण या प्रसिद्धीचा परिणाम तिच्या पोटापाण्याच्या व्यवसायावर होतो आहे. लोक तिला पाहिलं की तिच्या मागे लागतात. तिला त्रास देतात. त्यामुळे तिची माळा विक्री राहूनच जाते. असं मोनालिसाच्या आजोबांनी सांगितलं. तिच्या सौंदर्याची भुरळ अनेकांना पडली आहे. मोनालिसा अवघ्या १६ वर्षांची आहे. तिला जी प्रसिद्धी मिळाली त्यापेक्षाही तिला उदरनिर्वाहासाठी जो व्यवसाय ती करते तो अधिक महत्त्वाचा वाटतो तिने काही दिवसांपूर्वी हे माध्यमांनाही सांगितले आहे.मोनालिसाचे खरे नाव मोना भोसले मोनालिसाचे खरे नाव मोना भोसले असे आहे. ती इंदूरची आहे. तिच्या सौंदर्याची तुलना मोनालिसाच्या सौंदर्याशी केली गेल्याने तिला कुंभमेळ्यातली मोनालिसा असे म्हटले गेले आहे. आता तिला एक मल्याळम चित्रपट मिळाला आहे. याआधी तिला एक हिंदी चित्रपटही मिळाला होता पण तो पूर्ण होऊ शकला नाही. आता या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण होणार आहे आणि मल्याळम चित्रपटातून मोनालिसा पदार्पण करणार आहे.

# रणबीर-आलिया भट्ट लवकरच करणार गृहप्रवेश

## २५० कोटींचा अलिशान बंगला तयार



मुंबई-बॉलिवूडचे लोकप्रिय कपल रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांचे स्वप्नातील घर अखेर तयार झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या घराचे बांधकाम आता पूर्ण झाले असून, लवकरच ते गृहप्रवेश करणार आहेत. मुंबईतील पाली हिल परिसरात बांधलेल्या या सहा मजली आलिशान बंगल्याची किंमत सुमारे २५० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे, ज्यामुळे हे घर बॉलिवूडमधील सर्वात महागड्या घरांपैकी एक बनले आहे.हे घर रणबीर कपूरच्या कुटुंबासाठी खूप खास आहे. या जागेवर रणबीरचे आजोबा, प्रसिद्ध अभिनेते राज कपूर आणि त्यांची पत्नी कृष्णा राज कपूर यांचे घर होते. आता रणबीरने त्याच ठिकाणी एक आधुनिक आणि भव्य बंगला उभारला आहे. या बंगल्याला त्याने आपल्या आजीच्या नावावरून मकृष्णा राजफ असे नाव दिले आहे. रणबीर-आलिया त्यांची मुलगी राहा कपूरसोबत या नवीन घरात लवकरच शिफ्ट होणार आहेत. सोशल मीडियावर या बंगल्याचे काही व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाले आहेत, ज्यात घराची भव्यता स्पष्टपणे दिसते. बंगल्याचे बाह्य डिझाइन आधुनिक असून, त्यात पांढऱ्या आणि ग्रे रंगाचा वापर केला आहे. प्रत्येक मजल्यावर मोठ्या बाल्कनी असून, त्यात हिरवीगार झाडे लावण्यात आली आहेत. घरात मोठे झुंबर, आलिशान सोफे आणि सुंदर इंटिरियर आहे.या बंगल्याची किंमत शाहरुख खानच्या ममन्नतफ आणि अमिताभ बच्चन यांच्या मजलसाफ बंगल्यापेक्षाही जास्त असल्याचा दावा केला जात आहे, ज्यामुळे याची चर्चा अधिकच वाढली आहे. रणबीर आणि आलियाने या घराच्या बांधकामावर जातीने लक्ष ठेवले होते. ते अनेकदा त्यांची आई नीतू कपूर आणि मुलगी राहासोबत बांधकाम पाहण्यासाठी आले होते. आता हे कपल आपल्या नव्या घरात मुलीसोबत नव्या आयुष्याची सुरुवात करण्यास उत्सुक आहे. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर ते गृहप्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# दयानंद शिक्षण संस्थेत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्थे अंतर्गत असणाऱ्या आठही महाविद्यालयांच्या वतीने २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अनुषंगाने उपस्थितांना शपथ देण्यात आली.




या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमात प्रा.मधुकर क्षीरसागर आणि डॉ. गोपाल मोघे यांनी उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. दयानंद वाणिज्य, कला, विज्ञान, विधी, फार्मसी, आर्किटेक्चर, इंटेरिअर डिझाईन आदी महाविद्यालयाच्या पुढाकाराने हा उपक्रम झाला. या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमास प्राचार्य वाजेद चाऊस, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे, डॉ. महेश बेंबडे, डॉ. नितेश स्वामी, डॉ. विक्रम चिंते, प्रा. प्रशांत दीक्षित, प्रा. ऋषिकेश मस्के, प्रा. कल्पना टप्पेकर, प्रा. विनोद गौरे, प्रा. वैष्णवी जोशी आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्जदारांसाठी एकरकमी व्याज सवलत योजनेचा लाभ

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने संपूर्ण थकीत कर्ज प्रकरणांसाठी एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याज रकमेवर ५० टक्के सवलत (वन टाइम सेटलमेंट - ओटीएस) देणारी सुधारित योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू केली आहे.

या योजनेचा लाभ घेऊन थकबाकीदार लाभार्थ्यांनी कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एस. एन. झुंजारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पहिला मजला, जात पडताळणी इमारत, जुनी डालडा फॅक्ट्री, शिवनेरी गेटसमोर, गुळ मार्केट, लातूर येथील महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान; तातडीने पंचनामे करा

## अधिकाऱ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचना; नुकसानग्रस्त शेतीचे पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आले त्यामुळे अनेक गावचा संपर्क तुटला असून पूरपरिस्थितीमुळे आणि सखल भागातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही ठिकाणी घरात पाणी शिरले. जोमात आलेल्या सोयाबीनसह सर्वच उभ्या पिकात अनेक ठिकाणी पाणीच पाणी झाले आहे. नुकसानीत आलेल्या शेतीची पाहणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी शुक्रवारी केली यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधला. नदी, ओढे, नाल्याकाटच्या शेतीसह अतिवृष्टी झालेल्या भागातील नुकसान ग्रस्तशेतीचे तातडीने सरसकट पंचनामे करावेत अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या त्याचबरोबर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.





गेल्या दोन दिवसापासून सर्वत्र जोरदार पाऊस होत आहे या पावसामुळे नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत होते. मांजरा आणि रेणा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडल्याने नद्यांना पूर आले. या पूरपरिस्थितीमुळे नदीकाठच्या आणि काही ठिकाणी पाणी जायला रस्ता नसल्याने सखल भागातील शेतजमिनीत पाणीच पाणी झाले. काही ठिकाणी तर नदीपात्रापासून जवळपास एक किलोमीटर अंतरापर्यंतच्या शेतीत पाणी दिसून येत होते. शेतीतील सोयाबीनसह सर्वच पिकाचे तसेच फळबागा, भाजीपाला यांचेही खुप मोठे नुकसान झाले असून पुरामुळे काही ठिकाणी जमिनी खरडून वाहून गेल्या. अरुंद आणि कमी उंचीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने अनेक गावच्या वाहतुकीचा खेळखंडोबा झाला. काही गावचा संपर्क तुटला तर अनेकांच्या घरात पाणी शिरले. या सर्व परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. नदीकाठच्या आणि सखल भागातील आपतग्रस्त शेतीची पाहणी केली.

यावेळी उपजिल्हाधिकारी अविनाश कोरडे, रेणापूरचे तहसीलदार राजेभाऊ कदम, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, रेणापूरचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, लातूरचे शाम गोडभरले, कृषी अधिकारी नितीन कांबळे आणि प्रमोद राठोड, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, अनिल भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, दशरथ सरवदे, माजी उपसभापती अनंत चव्हाण, माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह त्या नाही यासाठी संरक्षण भिंत बांधण्यात यावी अशा सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

भाडगाव, बिंदगीहाळ, बोकनगाव, पांढरी या गावांचा संपर्क तुटला असून रेणापूर ते अष्टामोड रोडवरील बामणी नदीवरील पुलाचे काम सुरू असल्याने वाहतुकीसाठी तयार केलेला तात्पुरता पूल नदीच्या पुरात वाहून गेल्याने या रस्त्यावर दुर्घटना घडू नये यासाठी वाहतूक बंद ठेवावी अशा सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर ठीक ठिकाणी नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधून आ. कराड यांनी दिलासा दिला.

पाहणी दौऱ्यात त्या त्या ठिकाणी सरपंच धनंजय पवार, सचिन दाने, वैजनाथ जाधव, बाबुराव सोमवंशी, शिवाजी सोमवंशी, दौलत पवार, मंचक सरवदे, नामदेव बोंबडे, अच्युत कातळे, राजकुमार आलापुरे, विजयकुमार मलावडे, पांडुरंग बालवाड, संजय सावंत, आदिनाथ मुळे, लक्ष्मण मुळे, लक्ष्मण नागिमे, राम बंडापल्ले, संजय ठाकूर, मारुती शिंदे, गोविंद पनगुले, मोहनराव राऊतराव, रुपेश काळे, लिंबराज बोळंगे, हरिदास होपळकर, सचिन वैद्य, व्यंकट जटाळ, गव्हाणे हनुमंत, सचिन साबदे, मुकुंद केसरे, चंद्रकांत पासमे, बबलू अकनगिरे, संजय इगे, कमलाकर बस्तापुरे, संतोष राठोड, हनुमंत भालेराव, प्रल्हाद फुलारी, संगमेश्वर तत्तापूरे, नागनाथ आडतराव, दिलीप अकनगिरे, सचिन शिरसकर, लखन आवळे, सोपान सातपुते, मनोज चक्रे, समीर माने, बालाजी भिकाने, राजकुमार कुलकर्णी, अनंत कातळे, तुकाराम कोतवाड, बालाजी कातळे, बळीराम कुरे, निलेश देशमुख यांच्यासह शेतकरी कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते.

# दयानंद विज्ञानच्या बी.एस्सी.सी.एस.तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची नाशिक येथील एनपी आयटी सोल्युशन्स येथे औद्योगिक शैक्षणिक सहल

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था,संचलित दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील बी.एस्सी.सी.एस.तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची नाशिक येथील एनपी आयटी सोल्युशन्स येथे दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी औद्योगिक शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आलेली होती.या शैक्षणिक सहलीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,पदव्युत्तर विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू यांचेही सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

सदरील शैक्षणिक सहल दौऱ्यात एकूण ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या विद्यार्थ्यांसोबत प्रा.व्ही.जी.कुलकर्णी,प्रा.ए.आर. चौधरी,प्रा.ए.एम.बोराडे आणि प्रा.डी.आर. धुमाळ या चार प्राध्यापकांचा सहभाग होता.या भेटीचा उद्देश शैक्षणिक ज्ञान आणि उद्योग पद्धतींमधील माहिती घेणे हा होता.या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट,प्रोजेक्ट मॅनेजमेंट,सायबर सुरक्षा आणि आयटी पायाभूत सुविधांमधील सध्याच्या ट्रेंडच्या विविध पैलूंची ओळखही करून देण्यात आली.कंपनीच्या तज्ज्ञांनी रिअल-टाइम समस्या सोडवण्याबद्दल आणि नवोदित व्यावसायिकांकडून उद्योगाच्या अपेक्षांबद्दल अंतर्दृष्टी देखील सामायिक केली. हा दौरा अत्यंत माहितीपूर्ण ठरला,ज्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक आयटी फर्मच्या कामकाजाच्या वातावरणाची मौल्यवान ओळख झाली.व्यावहारिक निरीक्षण आणि उद्योग व्यावसायिकांशी संवाद साधून सैद्धांतिक संकल्पनांबद्दलची त्यांची समज वाढविण्यासही मदत झाली.संगणकशास्त्र विभागाने एनपी आयटी सोल्युशन्सकडून त्यांच्या आदरातिथ्याबद्दल आणि विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण शिक्षण अनुभव प्रदान केल्याबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली.

# पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत द्या

## काँग्रेसचे प्रवक्ते व माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**लातूर/प्रतिनिधी :** मागील दोन दिवसापासून लातूर ग्रामीण सह लातूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. पहिल्या दिवशी २९ मंडळात तर दुसऱ्या दिवशी ३७ मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. त्यामुळे सर्व नदी, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे असून शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. पिकांबरोबरच पशुधनाचे व घरांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली आहे.

मांजरा, रेणा, तावरजा प्रकल्पातील पाण्याची पातळी वाढल्याने जिल्ह्यात नद्या, ओढ्यांच्या पातळीत वाढ होवून पुरपरिस्थिती निर्माण झाली आहे. मागील दोन ते तीन दिवसापासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत असल्यामुळे सर्व साठवण तलाव, प्रकल्प भरले असून नदी, नाले, ओढे दुथडी वाहत आहेत. लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावातील घरामध्ये पावसाचे पाणी घुसल्याने घरांचे नुकसान होवून जनजीवन विस्कळीत झाले आहे. अतिवृष्टी झाल्यामुळे जनावरे दगावली आहेत. त्यामुळे पशुपालकाचे नुकसान झाले आहे.

सध्या उडीद-मुग काढणीच्या अवस्थेत तर सोयाबीनला शेंगा लागल्या आहेत. अशा अवस्थेत मुसळधार पाऊस होत असल्याने अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेली आहेत. पिकांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत आहे. त्यात पावसामुळे जनावरे दगावल्याच्या घटना घडल्या आहेत. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी निवेदनात नमूद केली आहे.

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHEIKH BALAN BAHADURSAHAB.
TO:- BALAN BAHADUR SHAIKH.
Hence for this Declaration i will be known by this name and will use. in future the BALAN BAHADUR SHAIKH. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SHEIKH BALAN BAHADURSAHAB.
NEW NAME:- BALAN BAHADUR SHAIKH.
Address :- AT JAJNUR, POST. LABOTA, TA. NILANGA, DIST. LATUR.
Adhar no.-960261799690
Mob. No.-8888450665

## जाहीरनामा
## श्री.ए. के. देशमुख, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात

वारसा प्रमाणपत्र क्र. १५२३/२०२५
दिपक वि. निरंक
निशाणी क्रमांक ०६

ज्यापेक्षा मयत वामन पिता हणमंत साळुंके यांचा दिनांक २०.१२.२०२४ रोजी लातूर येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात
अर्जदार
दिपक पिता वामनराव साळुंके, वय ३६ वर्षे, चंदा मजुरी,
रा. नवरत्न नगर, काशिलिंगेश्वर, लातूर.

इतर वारस-
१. पद्माबाई . वामनराव साळुंके, वय ५९ वर्षे, धंदा घरकाम,
२. बालाजी पिता बामनराव साळुंके, वय ४४ वर्षे, धंदा मजुरी,
दोघे रा. नवरत्न नगर, काशिलिंगेश्वर, लातूर.

यांनी मयत वामन पिता हणमंत साळुंके यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकरणात मयत वामन पिता हणमंत साळुंके यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार व इतर वारस यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करून तसे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय आणि निमशासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी त्यांच्या हकामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार व इतर वारस हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व इतर वारस यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख २६.०८.२०२५
पुढील तारीख २६.०९.२०२५

कोर्ट शिक्का

आदेशावरून,

स्वाक्षरित/-
ए. के. धोकटे
क. लिपीक

स्वाक्षरित/-
सहा. अधिक्षक,
दिवाणी न्यायालया व. स्तर,
लातूर

## श्रीमती एम. एन. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांचे न्यायालयात
### वारसाचे प्रमाणपत्र मिळेणबाबत जाहीरनामा

वारसा प्रमाणपत्र क्र. १५२४/२०२५
संभाजी वि. निरंक,
निशाणी क्र. ०६

ज्यापेक्षा मयत **रंजनाबाई भ्र. संभाजी मस्के हे दिनांक २०.०७.२०२० रोजी मौजे संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर ता. व जि. लातूर** येथे मयत झाले असून
अर्जदार,
संभाजी पिता राघू मस्के वय ७२ वर्षे, धंदा सेवानिवृत्त,
रा. संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर ता. व जि. लातूर
ईतर वारस-
१. लक्ष्मण पिता संभाजी मस्के वय ४३ वर्षे, धंदा नोकरी,
२. विनोद पिता संभाजी मस्के वय ४० वर्षे, धंदा व्यापार,
३. वर्षा भ्र. दत्ता उर्फ दत्तात्रय मस्के ३५ वर्षे, धंदा घरकाम,
४. दक्ष पिता दत्ता उर्फ दत्तात्रय मस्के
वय १९ वर्षे, धंदा -शिक्षण,
५. शर्वरी पिता दत्ता उर्फ दत्तात्रय मस्के वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण, इतर वास्स क्र. ५ अज्ञान असून त्यांच्या अ.पा. क. नैसर्गीक आई ई.वा. क्र. ३ आहेत.
सर्व रा. संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड,
लातूर ता. व जि. लातूर
६. निर्मला भ्र. रमेश कांबळे वय ४७ वर्षे, धंदा घरकाम,
रा. गवळी नगर, लातूर ता. व जि. लातूर

यांनी सदरहू मयताचे मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयासमोर अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास त्याला सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

आज तारीख :- २६.०८.२०२५
**पु.ने.ता.:- ३०.०९.२०२५.**

आदेशावरून,

कोर्ट शिक्का

स्वाक्षरित/-
(व्ही. पी. उमाटे)
क. लिपीक

स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालया व. स्तर,
लातूर

## माजी गव्हर्नर उर्जित पटेलांची आयएमएफ कार्यकारी संचालक पदी नियुक्ती

मुंबई : आरबीआयचे माजी गव्हर्नर डॉ उर्जित पटेल यांची आंतरराष्ट्रीय नाणे निधी या जागतिक दर्जाच्या संस्थेच्या कार्यकारी संचालक पदावर नेमणूक झाली आहे. मानव संसाधन मंत्रालयाने काही क्षणापूर्वी अध्यादेश जारी केला असून यामध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी पटेल यांची नेमणूक झाल्याचे स्पष्ट केले आहे.

## जाहीर निविदा सूचना(२/२०२५)
## नगर परिषद, निलंगा जि. लातूर

मुख्याधिकारी, नगर परिषद, निलंगा यांच्याकडून निलंगा नगरपरिषदेकरिता संगणक, प्रिंटर व UPS पुरवठा करणेकरिता पात्र ठेकेदाराकडून जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. कामाचे | कामाचे नाव | बयाना रक्कम | कामाची मुदत | निविदा फोम फीस |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद,निलंगा संगणक, प्रिंटर व UPS पुरवठा करणे | २०००/- | कार्यादेश मिळाल्या पासून ३० दिवस | ५००/- (ना परतावा) |

१) कोरे निविदा फोर्म विक्री दिनांक **३०/०८/२०२५ ते ०५/०९/२०२५** पर्यत भांडार विभागाकडे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मिळतील. २) निविदेसोबत भरावयाची बयाना रक्कम दि. ०५/०९/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील. ३)निविदा स्वीकृतीची अंतिम दि:- परिपूर्ण सीलबंद निविदा **दि.०५/०९/२०२५** सायं. ५.०० वाजेपर्यंत एकखीडकी विभागामध्ये स्वीकारल्या जातील. ४) **निवदा उघडण्याची दि;०६/०९/२०२५ रोजी मुख्याधिकारी कार्यालयात निविदा समितीसमोर उपस्थित** निविदाधारकांसमोर उघडण्यात येतील. काही कारणास्तव दाखल निविदा नमूद दिवशी उघडणे शक्य ना झाल्यास त्याबाबतची सूचना कार्यालयातील नोटीसबोर्डावर लावण्यात येतील. ५)निविदा कोणत्याही कारणाशिवाय नाकारण्याचा आथवा स्थगित ठेवण्याचा हक्क नगर परिषदेने राखून ठवेला आहे . ६) निविदा द्वी-लखोटा पद्धतीने सादर करावयाची आहे. ७) कामाच्या अधिक माहितीसाठी भांडार विभागाकंडे संपर्क साधावा.

स्वाक्षरीत /-
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, निलंगा**


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाची जागतिक दखल

# इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने सन्मान

**मुंबई/प्रतिनिधी :** शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिकस्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला. या अभियानाचे मार्गदर्शक आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'चे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष श्री. हेनरी आर (युरोप), प्रमुख श्री. पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष श्री. संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे.

महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची दखल जागतिकस्तरावर घेण्यात आल्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे छोटेखानी बैठकीत कौतुक केले. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांची उपस्थिती होती.



महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची आंतरराष्ट्रीयस्तरावर नोंद घेण्यात आली आहे. त्यानिमित्त प्रदान केलेल्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'चे प्रमाणपत्र व स्मृतिचिन्हासह महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, संचालक श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट.

'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. या संस्थेने महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभाग आंतरराष्ट्रीय विक्रम असल्याची घोषणा केली व मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला. यावेळी युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, नेपाळ आणि भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांसाठी महावितरणला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थांनी नुकतेच गौरविले आहे. आता या अभियानाच्या लोकसहभागावर आंतरराष्ट्रीय विक्रमाचा शिक्कामोर्तब झाला आहे.

### मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेविषयी ३ सप्टेंबर रोजी माजी सैनिकांसाठी केले जाणार मार्गदर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा उद्योग केंद्रामार्फत माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि अवलंबितांसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ दिला जात आहे. या योजनेंतर्गत विविध व्यवसाय सुरू करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

याबाबत माहिती देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी ३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता लातूर येथील माजी सैनिक मुलांच्या वसतिगृह येथे उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि अवलंबितांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

### तालुक्यात पाच पूल पाण्याखाली तर घरणी व मांजरा नदी यांनी धोक्याची पातळी ओलांडली

**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी :** तालुक्यात दोन दिवसापासून सतत पडत असलेल्या मुसळधार पावसाने ओढे नद्या,नाल्यांना, पूर आला असून, नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसाने अनेक गावचा संपर्क तुटला असून वाहतूक ठप्प झाली आहे. ओढे नद्या,नाल्यांना, पूर आल्याने अनेक खेड्या-पाड्यांचा संपर्क तुटला आहे. सध्या शिरूर अनंतपाळ ते उदगीर जाणारा घरणी नदीवरील पर्यायी पूल पाण्याने वाहून गेला आहे. तसेच शिरूर अनंतपाळ ते नागेवाडी, शिरूर अनंतपाळ ते हनमंतवाडी, शिरूर अनंतपाळ ते लक्कड जवळगा जाणारे पूल,तर साकोळ ते सांगवी घुग्गी जाणारा घरणी नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने अनेक गावचा संपर्क तुटला आहे.

तर तालुक्यातून जाणारी मांजरा व घरणी नदी यांनी सध्या धोक्याची पातळी ओलांडली असून,तालुक्यातील घरणी मध्यम प्रकल्प, साकोळ मध्यम प्रकल्प, व पांढरवाडी लघु प्रकल्प हे पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाले आहेत. सध्या तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली असून,तसेच तालुक्यात शेकडो हेक्टर वरील पिके पाण्याखाली गेले असून, मुसळधार पावसामुळे शेतातील बांध फुटून अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या असून,मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

दरम्यान तालुक्यात प्रशासनाकडून अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला असून, नागरिकांनी घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाने घातलेल्या थैमानात बळीराजावर संकट



ओढवले आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यात आतापर्यंत १६३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यात अनेक बस फेऱ्या रस्ते बंद झाल्याने रद्द करण्यात आल्या आहेत .हवामान खात्याच्या अंदाजानुसार अजून २४ ते ४८ तासात मुसळधार पाऊस असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. मंडळनिहाय प्राथमिक पाहणी व पूर परिस्थितीचा आढावा संजय ढाकणे तालुका कृषी अधिकारी, शिवाजी तारळकर,कृषी अधिकारी गुण नियंत्रण, बालाजी राजवाडे, मंडळ कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक स्वामी यांनी आढावा घेतला आहे. सध्या शिरूर अनंतपाळ ते उदगीर, साकोळ ते निलंगा, शिरूर अनंतपाळ ते देवणी, शिरूर अनंतपाळ ते येरोळ मार्गे उदगीर, असा मार्ग बंद करण्यात आला आहे.


CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM ANJU H R TRIPATHI TO ANJU HARIKESH TRIPATHY HENCE FOR THIS DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE ANJU HARIKESH TRIPATHY IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY ME.
OLD NAME :- ANJU H K TRIPATHY
NEW NAME :- ANJU HARIKESH TRIPATHY
ADD :- FLAT NO. 403 LAXMI DIAMOND APARTMENT, SARASWATI COLONY, LATUR, (M.S.) 413512


## सायबर वॉरियर्स'च्या मार्गदर्शनाखाली शिवाजी माध्यमिक विद्यालय, औसा येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत शिवाजी माध्यमिक विद्यालय, औसा येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा घेण्यात आली.



'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग मेसेज ओळखणे, पासवर्ड सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक प्रतिबंध, तसेच सायबर गुन्हे नोंदणी व हेल्पलाईन १९३० याबाबत मार्गदर्शन केले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभिमन्यू जंगाले, शिक्षकवृंद श्री. नागनाथ चिट्टे, श्री. सुभाष लोकरे व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची भावना जागृत झाली असून ते आता इंटरनेटचा अधिक सावध व सजगतेने वापर करतील, असा विश्वास उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केला.

## इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२३-२४ पासून लातूर जिल्ह्यात दोन शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. यात मुलांसाठी १०० आणि मुलींसाठी १०० अशा एकूण २०० विद्यार्थी क्षमतेच्या वसतिगृहांचा समावेश आहे. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि शैक्षणिक साहित्य मोफत पुरवले जाते. या वसतिगृह प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असून पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी त्या शहराचा स्थानिक रहिवाशी नसावा, जिथे शैक्षणिक संस्था आहे. विद्यार्थ्याने बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेतलेले असावे आणि बारावीत किमान ६० टक्के गुण असावेत.

सन २०२५-२६ साठी रिक्त जागांवरील वसतिगृह प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. मुलींच्या वसतिगृहाबाबत माहितीसाठी गृहपाल श्रीमती वृषाली बडे (मो. ९०२८२६११८३) आणि मुलांच्या वसतिगृहाबाबत माहितीसाठी गृहपाल तिरुके सुरज (मो. ८३२९४४७४१०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर श्री. अभय अटकळ यांनी केले आहे.

### सुखकर्ता ..

घरोघरी भेटी गाठी
वणवण फिरे नेता
कारण सांगे आलो
गणेशदर्शना करता

मुफ्त वाटे शुभेच्छा
कृपा करे सुखकर्ता
काय दडले अंतरात
सत्यजाणे दुःखहर्ता

सोबतीसर्कमे-यांचा
ताफा कशाला नेता
नैवेद्य आश्वासनांचा
प्रसाद भरभरू घेता

थबके दक्षिणाठेवता
पुढे होतो कार्यकर्ता
इदम् मम् चं म्हणता
हातालाहात लावता

असो पक्ष कुठलाही
साधारण समानकथा
पुढल्यावर्षी त्वरे यावे
धन्यवाद दे मत दाता

एवढे पहायचे व्हावी
प्रकाशित प्राईमवार्ता
देवांनाही वेठी धरता
कसे सत्तास्थानाकर्ता

कायकाय करावेलागे
चित्र विचीत्र ही सत्ता
ओळखा कसा रे नेता
दे रे गणेशा बुध्दीमत्ता

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.



शिवब्रम्हांड गणेश मंडळ, एकमत चौक, पंचवटी नगर, लातूर येथे गणेशाची स्थापना यावेळी कार्यकर्ते - शुभम क्षीरसागर, रवी उडते, किशोर माने, ओम पत्रिके, सत्यजीत गजभार, सुशील जळकोटे, अक्षय महामुनी, चंद्रकांत बिरादार, वैभव दासलकर, विवेक भेंडेगावे दिसत आहेत.


मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
गती शक्ती युनिट (सिव्हिल वर्क)
**ई-निविदा सूचना क्रमांक:** ०२-२०२५-जीएसयू-सिव्हिल सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवीत आहे. **कामाचे नाव:** दौंड-सोलापूर विभागावरील किमी ३८७/३-४ वर एलसी-४० च्या जागी २ लेन आरओबीचे प्रस्तावित बांधकाम. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ३३,८५,२६,१३३.०८, **बयाणा रक्कम:** रु. १८,४२,६००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १८ (अठरा) महिने, **देखभाल कालावधी:** ६ महिने किंवा एक पावसाळा यापैकी जे नंतर असेल. **www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १८.०९.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** १८.०९.२०२५ रोजी १५.३० नंतर. **वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in. टीप:** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून **www.ireps.gov.in** या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल.
एडीई (जीएसयू), सोलापूर
Download UTS App for Tickets SLP-54



मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
गती शक्ती युनिट (सिव्हिल वर्क)
**ई-निविदा सूचना क्रमांक:** ०३-२०२५-जीएसयू- सिव्हिल. सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवीत आहे. **कामाचे नाव:** दौंड-सोलापूर विभागावरील किमी ३११/८-९ येथे लियू इल एलसी-४२ मध्ये ०२ लेन आरओबीचे प्रस्तावित बांधकाम. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ३९,९०,८१,७९६.३१, **बयाणा रक्कम:** रु. २१,४५,४००.००, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १८ (अठरा) महिने, **देखभाल कालावधी:** ६ महिने किंवा एक पावसाळा यापैकी जे नंतर असेल. **www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १८.०९.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** १८.०९.२०२५ रोजी १५.३० नंतर. वेबसाइट तपशील: **www.ireps.gov.in.** टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल: **www.ireps.gov.in.**
एडीई (जीएसयू), सोलापूर
Download UTS App for Tickets SLP-55



टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
गॅरंटीड प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६